म. ग्रं. सं. ठाणे
विषय
स. नं.

र हणमंतराव

उर्फ

# बाबासाहेब देशमुख

आद्यसंस्थापक,

दि विदर्भ मिल्स बेरार लि०

इलिचपूर

REFBK-0006498

लेखकः—

धोंडो मुकुंद देशपांडे

# कै० व्यंकटराव हणमंतराव

—उर्फ—

# बाबासाहेब देशमुख

आद्यसंस्थापक—

दि विदर्भ मिल्स बेरार लिमिटेड, एलिचपूर—वऱ्हाड.

# चरित्र

लेखक व प्रकाशक:—

धोंडो मुकुंद देशपांडे, बाळापूरकर

अहिंसा, भद्रकाली, पृथ्वीवल्लभ, साधू की सैतान वगैरे पुस्तकांचे

—तसेंच—

शिवकालीन तरुण, श्रीमंत, आईसाठी वगैरे संगीत नाटकांचे कर्ते.

मुकुंदाश्रम विदर्भ मिल्स एलिचपूर—वऱ्हाड.

REFBK-0006498

आवृत्ति पहिली

( सर्व हक्क लेखकाने स्वाधीन ठेवले आहेत. )

२३ एप्रिल, सन १९४४ ) ( किंमत रु. १॥

# अनुक्रमणिका


| अ. नं. | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | घराण्याचा त्रोटक इतिहास .... ... ... | १ |
| २. | बालपण .... .... .... .... | ३ |
| ३. | शिक्षण व विवाह ... .... .... | ९ |
| ४. | भाऊबंद .... .... .... .... | ११ |
| ५. | मिळकतीची व्यवस्था .... .... .... | १२ |
| ६. | सामाजिक कार्य .... .... .... | १५ |
| ७. | व्यापार .... .... .... .... | २० |
| ८. | विदर्भ मिल-एलिचपूर .... .... .... | २२ |
| ९. | धार्मिक, सामाजिक व राजकीय मतें .... .... | ३३ |
| १०. | विद्याव्यासंग .... .... .... | ३६ |
| ११. | यशाची गुरुकिल्ली ... .... .... | ४१ |
| १२. | संतती व लोकसंग्रह .... .... .... | ४८ |
| १३. | अंतकाळ .... .... .... | ५५ |
| १४. | उपसंहार ... .... .... | ६२ |
| परिशिष्ट १ | गॅझेटीयरमधील उतारा .... .... .... | ६३ |
| ,, २ | चरित्रनायकाची जन्मपत्रिका... .... ... | ६४ |
| ,, ३ | चरित्रनायकाच्या जवळील नातेवाइकांची नोंद .... | ६५ |



मुद्रक---ना. म. ठाकूर मॅनेजिंग. एजंट,

ठाकूर आणि कं० लि०--चा महेश्वर प्रिं. प्रेस, अमरावती.

# चार शब्द

कै० व्यंकटराव हणमंतराव ऊर्फ बाबासाहेब देशमूख यांचें उद्बोधक व विस्तृत चरित्र लिहावें, अशी ते स्वर्गस्थ झाल्यानंतर, गावांतील सद्गृहस्थांची जी जाहीर दुःखवट्याची सभा झाली, त्याच वेळीं लेखकाने ठरविलें. त्या प्रमाणें या बाबतींत चरित्र लिहिण्यासाठीं कै० बाबासाहेबांच्या इष्टमित्रांना भेटून माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला. पुष्कळांना कै० बाबासाहेबांच्या आठवणी लिहून पाठविण्याविषयीं समक्ष व पत्रद्वारें विनंती करण्यांत आली. कांही जणांनी आठवणी ऐवजीं त्यांच्याविषयीं प्रशंसापर पत्रें पाठविलीं. आठवणींच्या अभावीं गोळा केलेल्या माहितीवरून विस्तृत चरित्र लिहिण्याची इच्छा असूनही तसें करणें शक्य झालें नाहीं.

मिळालेली माहिती फारच अल्प; ज्यांचें चरित्र लिहावयाचें ती व्यक्ति अत्यन्त थोर, तेव्हा त्रोटक व छोटेसें चरित्र लिहिण्यापेक्षा चरित्र न लिहिणें बरें, असें साहाजिक वाटलें व माहितीचीं टांचणें तशींच पडून राहिलीं.

कै० बाबासाहेब ही व्यक्ति वऱ्हाडांत असामान्य अशीच झाली. अशा व्यक्तीचें स्मारक असणें अत्यंत अवश्य आहे. सार्वजनिक वाचनालय, श्री. राधाबाई दवाखाना, सिटी हायस्कूल, श्री पांडुरंग जिनिंग ॲन्ड प्रेसिंग फॅक्टरी आणि विदर्भ मिल्स हीं तर त्यांचीं स्मारकें आहेतच. या शिवाय विदर्भ मिल्सनी मुंबईचे प्रसिद्ध शिल्पकार रा. रा. म्हात्रे

यांचेकडून कै. बाबासाहेब यांचा संगमरवरी अर्ध-पुतळा तयार करविला व तो त्यांच्या तेराव्या श्राद्धतिथीच्या सुमारास उद्‌घाटन करण्याचें ठरविलें.

कै० बाबासाहेबांसारख्या वऱ्हाडांतील स्वदेशीला उत्तेजन देणाऱ्या, गोरगरीबांना काम देणाऱ्या, जुन्या–नव्याचा मेळ घालणाऱ्या, बहुश्रुत व सदोदित उद्योगांत मग्न असणाऱ्या, तरुणांना आदर्श अशा व्यक्तीचें, इच्छा असूनही, माहितीच्या अभावीं, सर्वांगसुंदर व बोधपर चरित्र मला लिहितां येऊं नये याबद्दल विशाद वाटला. अखेरीस मिळविलेली माहिति तशीच ठेवण्यापेक्षा पुढे कोणाला इच्छा झाल्यास, तिचा थोडा तरी उपयोग होईल, या हेतूने तेराव्या वर्षश्राद्धाच्या तिथीच्या सुमारास कै० बाबासाहेब यांचें अगदींच छोटेसें, त्रोटक व माझ्या मतें अपूर्ण असें चरित्र प्रसिद्ध करण्याचें ठरविलें.

या चरित्रावरून कै० बाबासाहेब यांचें खरें अंतरंग व पूर्ण ओळख वाचकांना होणें शक्य नाही, याची लेखकाला पूर्ण जाणीव आहे. पण या लहानशा चरित्रावरून ज्यांना कै. बाबासाहेबांचा परिचय नव्हता, त्यांना त्यांच्याविषयीं थोडी तरी कल्पना होईल. माहितीच्या अभावीं त्यांच्या चरित्रांतील पुष्कळ महत्त्वाच्या सामाजिक, धार्मिक, व राजकीय क्षेत्रांतील घडामोडींचा या चरित्रांत उल्लेख न होणें शक्य आहे. कै० भाऊसाहेब शास्त्री वकील यांनी आपला अमोल वेळ मला दिला नसता तर हें छोटेसें चरित्र देखील प्रसिद्ध होणें शक्य नव्हतें. या चरित्राचें सर्व श्रेय खरोखर कै० भाऊसाहेब शास्त्री यांनाच आहे.

या चरित्राच्या कामीं ज्यांनी ज्यांनी मला सहाय्य केलें त्या सर्वांचा चार शद्बांत नामनिर्देश करणें शक्य नसल्याने मी सर्वांचे

मन:पूर्वक आभार मानतो. पण खालील इसमांच्या मदतीशिवाय हें चरित्र इतक्या थोड्या अवधींत प्रसिद्ध होणें दुरापास्त होतें म्हणून त्यांच्या सहाय्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

श्री. रावसाहेब पांडुरंगराव व्यंकटराव देशमूख,

चरित्रासाठीं माहिती पुरविल्याबद्दल, चरित्र वाचून जरूर त्या ठिकाणीं दुरुस्त्या सुचविल्याबद्दल, व चरित्र पूर्ण करण्याला व प्रकाशनाला प्रोत्साहन दिल्याबद्दल.

श्री. रा. रा. मोरेश्वर गणेश रिंगणगांवकर, बी. ए. व

श्री. रा. रा. विश्वनाथ कृष्ण कुळकर्णी,

या उभयतांनी छोटेसें चरित्र वाचून व त्यांत जरूर त्या दुरुस्त्या सुचविल्याबद्दल व प्रेस कॉपी तयार करून दिल्याबद्दल.

श्री. रा. रा. देशभक्त नानासाहेब बामणगांवकर, संपादक ' उदय '

या छोट्याशा चरित्राला प्रस्तावना लिहिल्याबद्दल व जी माहिती लेखकाला मिळाली नाहीं, ती प्रस्तावनेंत दाखल केल्याबद्दल तसेच प्रूफें तपासून दिल्याबद्दल.

श्री. रा. रा. ना. म. ठाकूर, मालक महेश्वर छापखाना, उमरावती

परीक्षेच्या पेपर्सच्या हंगामांत कामाचा बोजा असूनही अल्प मुदतींत पुस्तक छपाईचें काम सुबक व वक्तशीर करून दिल्याबद्दल.

मुंबईचे प्रख्यात शिल्पकार रा. ब. म्हात्रे यांनी तयार केलेल्या कै० बाबासाहेब यांच्या अर्धपुतळ्याचा [ बस्ट ] अनावरण समारंभ श्री. **लोकनायक बापूजी अणे** यांचे हस्तें ता. २३ एप्रिल १९४४इ. रोजीं होणार असल्याने, त्याच दिवशीं व त्याच प्रसंगांत या छोट्याशा चरित्राचें प्रकाशन त्यांचेच हस्तें होण्याचा सुयोग आल्याने लेखक स्वतःला धन्य मानीत आहे. या समारंभाचे प्रसंगांतच; मिलसचे मॅनेजिंग एजंट श्री० रा. रा. नानासाहेब देशमूख यांनी चरित्रप्रकाशनाचा कार्यक्रम समाविष्ट केल्याने लेखक त्यांचा ऋणी आहे.

कै० बाबासाहेब यांचे चरणीं हें त्यांचेंच अल्प चरित्र लेखक कृतज्ञतापूर्वक नम्रपणाने समर्पण करीत आहे.

कै० बाबासाहेब यांच्या आत्म्याला शांति मिळो अशी श्रीपांडुरंगाचे चरणीं नम्र प्रार्थना आहे.

मुकुंदाश्रम, एलिचपूर<br>रविवार ता. २३-४-१९४४

**धोंडो मुकुंद देशपांडे**<br>( बाळापूरकर )

## —: माझा आदरभाव :—

वऱ्हाडला १८५३ पासून इंग्रजांचा सहवास होऊं लागला. तेव्हांपासून परंपरागत असें शुद्ध वऱ्हाडीरक्त ज्यांच्यांत खेळत होतें त्यांपैकीं कोणावर कोणता आदर्शभूत परिणाम झाला हें पहावयाचें असलें तर पहिल्या व दुसऱ्या पिढींत दोनच आदर्शवत् पुरुष डोळ्यांसमोर उभे राहतात. कै० दादासाहेब खापर्डे हे एक ह्यापैकींच आदर्शवत् पुरुष असून दुसरे आमचे चरित्रकार कै० बाबासाहेब देशमुख होत. कै० दादासाहेब अत्यंत बहुश्रुत असें विद्वान होते. चतुरश्रता, रसिकता, विनोदी वृत्ति, मधुर व मार्मिक वक्तृत्व ह्या गुणांनी त्यांनी आपल्या वकीलीच्या धंद्यांत तर लौकीक संपादन केलाच. पण सर्व भरतखंडालाहि त्यांनी आपल्या वैशिष्ट्यानें वेड लावलें होतें. आणि औदार्यानें आश्रीत वर्ग पूर्णपणें आपलासा केला होता. मराठी, पारशी, इंग्रजी, संस्कृत, गुजराथी ह्या पांच भाषांवर त्यांचें प्रभुत्व प्रस्थापित झाल्यामुळें साहित्यकांचा फार मोठा वर्ग त्यांनीं उपकृत करून ठेवला. ह्यामुळें नव्या युगांतील वैदर्भीय पंडीत म्हणून त्यांच्याकडे पहात असत. कै. बाबासाहेब देशमुख म्हणजे दादासाहेब खापर्डे नव्हत हें खरें; पण नव्या युगाला साजेशी पांडित्यपूर्णता ह्यांत जसे दादासाहेबांचें वैशिष्ट्य आहे. ह्याचप्रमाणें नव्या युगाला साजेशी उद्योगप्रियता व उद्योगधंद्याचा आद्यप्रवर्तक होणें हें कै. बाबासाहेब देशमुखांचें वैशिष्ट्य आहे. वऱ्हाडी रक्तांत असें वैशिष्ट्यपूर्ण पुरुष निर्माण होणें हें पहिल्या दुसऱ्या पिढींतील नवलच होय.

चरित्रकार कै० बाबासाहेब देशमुख व कै० दादासाहेब खापर्डे ह्या दोघांचेंहि बालपण वऱ्हाडच्या जुन्या राजधानींत एलिचपूर शहरांत गेलें. कै० दादासाहेब हे अधिकाऱ्याचें चिरंजीव असून त्यांच्या तरुण-पणांत त्यांच्या वडिलांना श्रीमंतीहि लाभली होती. कै० बाबासाहेब एकुलते एक; पण वतनदाराच्याच कुळांत जन्मले व वाढले. पण नबाबी राजधानींतून जें ऐश्वर्य व जो गुण संचारत असतो त्या पासून स्वतःचें वैशिष्ट्य कायम ठेवणें, तेंच वाढवणें व त्याचाच लाभ घेणें व देणें असें पुरुष क्वचितच असतात. इतकेंच नव्हे तर पहिल्या सुखवस्तू कुळांत नव्या गुणांची वाढ होऊन वैशिष्ट्यपूर्ण असें पुरुष निर्माण झाल्याचें उदाहरण सांपडणेंहि कठीणच. कै० बाबासाहेब देशमुख व कै० दादासाहेब खापर्डे ह्यांचा संबंध चरित्रकारांनी रेखाटला नाहीं. कारण बाबासाहेबांचें वास्तव्य व कार्यक्षेत्र निराळें व दादासाहेबांचें वास्तव्य नि कार्यक्षेत्र निराळें असल्यामुळें ह्या दोन व्यक्तींचा ठळक संबंध काय होता व काय नाहीं ह्याविषयीं कागद पत्र असणें शक्य नाहीं. तशांत चरित्रलेखक पडले अलिकडचे. उमरावती व एलिचपूर येथेंच त्यांचें अधिक आयुष्य गेलें असतें तर कदाचित् त्यांना ह्या दोघांचा स्नेह होता हें कळलें असतें.

तथापि कै. बाबासाहेबांच्या धार्मिक, सामाजिक, व राजकीय आचरणाचा उल्लेख चरित्रकारांनीं केला आहे. ह्या धार्मिक, सामाजिक, व राजकीय आचरणाचे पहिले जनक दादासाहेब खापर्डे होत हें प्रसिद्ध असल्यामुळें एकमेकांचा सहवास वा संगतीवाचून एकमेकांच्या गुणांत हें साम्य उतरत नाहीं. कै. दादासाहेबांपेक्षां कै. बाबासाहेब वयानें थोडे

लहान, पण गुणग्राहकता हें त्यांचें वैशिष्ट्य असल्यामुळें परस्पर विचार विनिमयानें व संगतीनें धार्मिक, सामाजिक व राजकीय आचरणांत साम्य येणें स्वाभाविक आहे. स्वदेशी बहिष्कार, व राष्ट्रीय शिक्षणाच्या १९०६–७ मधील चळवळीच्या वेळीं कै. दादासाहेब खापर्डे कर्णधार होते. तर एलिचपूर शहर व तालुका ह्यांत कै. बाबा-साहेब हे कै. दादासाहेबांना आधार होते व सहाय्यकहि होते. १९१८ वा १९१९ मध्यें एलिचपूर येथें उमरावती जिल्हा परिषद भरली. त्यावेळीं स्वागत मंडळाचे अध्यक्ष कै. बाबासाहेब देशमुख होते व अध्यक्षस्थानीं त्यांच्याच आग्रहामुळें कै. दादासाहेब खापर्डे होते. स्वागताध्यक्षीय भाषणांत कै. बाबासाहेबांनीं कै. दादासाहेबांविषयींचा आदर व्यक्त केला आहे. त्या परिषदेला हजर असलेले अनेक देशभक्त अजून हयात आहेत. शिवाय ह्या दोन्ही व्यक्ति अशा नामवंत कीं, त्या शहरांत वाढल्यावर एकमेकांच्या परिचयाच्या राहणार नाहींत हें मानावयाचें कसें? प्रांतांतील तत्कालीन नामवंत व्यक्तींचे व बाबासाहेबांचे संबंध काय होते हा एक भाग जर त्यांच्या चरित्राला जोडला गेला असता तर बाबासाहेब हे स्वतःचे कुटुंब ह्याच एका विशेष दृष्टीचे नव्हते तर प्रांताचे सार्वजनिक हित कसें साधावें ह्या सामुदायिक अशा विशाल दृष्टीचाहि त्यांच्यांत उदय झाला होता हेंहि प्रत्ययास आलें असतें.

जुने कुटुंबनिष्ठ लोक बहुधा आप्तानिष्ठ अधिक असतात. त्यांचेंच अधिकाधिक कल्याण हाच त्यांचा विशेष असतो. पण बाबासाहेबांच्या एवढ्याच मर्यादा नव्हत्या. समुदायाच्या कल्याणांत आपलें कल्याण आहे

ही वृत्ति त्यांच्यांत जागृत झाली होती म्हणूनच परस्पर सहकार्यावर भांडवल उभारून, त्यांत काटकसर करून, स्वतः शारिरीक कष्ट सहन करून विदर्भ मिल्सची उभारणा त्यांनी केली. पहिला वऱ्हाडी पहिल्याने एलिचपूर सारख्या आजच्या तालुक्याच्या ठिकाणीं, जुन्या वतनी वृत्तींत अजून खेळत असलेल्या गांवीं गिरणीची चिमणी उभारतो हें आश्चर्य कसें नव्हे? एकट्या बाबासाहेबांना साडेचार-पांच हजार सालीना वतनाचें उत्पन्न चैन करावयास पुरेसें होतें. पण जें होतें तें कमी केलें नाही. उलट वाढविलें. इतकें वाढविलें कीं, अनेक पुत्रांना प्रत्येकीं आपल्यापेक्षां दीडपट उत्पन्न त्यांनी करून ठेवलें असें चरित्रलेखक नमूद करतात. ह्याकरितां कृपण वृत्ति वा गळेकापूपणा इकडे त्यांचा ओढा होता असें नव्हे. योग्यायोग्यतेची जाणीव ठेऊन, कार्याकार्याचा विचार करून ते देणग्याहि देत असत. सचोटी व हिशेबी वृत्तीचा धर्मशील बुद्धीनें व्यवहार करून मूळ उत्पन्नांत वाढ केली. वतनदारांनीं वतनें गमाविलीं पण वडिलोपार्जित इस्टेटींत वतन व शेती संभाळून वाढ केल्याचें उदाहरण वऱ्हाडांत तरी बाबासाहेबांचेंच दिसतें. शिक्षण घेऊन नोकरी केली, वकीली केली व पैसा मिळविला अशीं उदाहरणें सांपडतील. पण हा मार्ग अपुरा आहे असें समजून वऱ्हाड्याने सामुदायिक व समायिक भांडवल एकत्र करून संपत्ति वाढवावयास शिकले पाहिजे व यंत्र सहाय्यानें उद्योगधंदे निर्माण केले पाहिजेत हें जुन्या कॉंग्रेस पुढाऱ्यांचें म्हणणें कोणा जातिवंत वऱ्हाड्यांत बिंबलें असेल तर तें कै० बाबासाहेबांतच होत.

कै० बाबासाहेब देशमुख ह्यांना कै० दादासाहेब खापर्डे ह्यांच्याविषयीं नितांत आदर वाटत असला तरी कै० रा. ब. मुधोळकर, सर

मोरोपंत इत्यादि पुढाऱ्यांविषयींहि आदरभाव ठेऊनच होते. इतकेंच नव्हे तर राष्ट्रीय वृत्तीचा योग्य कार्यकर्ता निघाला तर त्याच्याविषयीं ते आपुलकीची भावना बाळगीत. लोकनायक बापुजी अणे हे बाबासाहेबां-पेक्षां वयानें लहान. पण बापुजींच्या शब्दावर विश्वास ठेऊन वागण्या-इतके ते निष्ठावंत होते. सामुदायिक व सार्वजनिक हितबुद्धी त्यांच्यांत मुळांतच जागृत होती म्हणूनच ते असे वागत. माझी गीरणी यशस्वी झाली तर वऱ्हाडांतील सार्वजनिक चळवळीचे—अर्थात् सनदशीर चळवळीचे ती गिरणी पोषण करील असें ते तळमळीनें बोलत. बाबासाहेबांनीं आपलीं मुलें उद्योगधंद्याच्या निरनिराळया क्षेत्रांतच प्रगती-पर बनतील अशाच तऱ्हेचें त्यांना शिक्षण दिलें आहे. तीं मुलें बाबासाहेबांनीं निर्माण करून ठेवलेलें क्षेत्र रक्षीत आहेत, उन्नत करीत आहेत. सर्वच मुलें नव्या काळांत नव्या दृष्टीचीं असल्यामुळें बाबा-साहेबांमधील सामुदायिक दृष्टी त्यांच्यातहि कारणपरत्वें वाढीस लागली आहे व तसें दृश्य वऱ्हाडांत दृग्गोचर होत आहे, असा प्रत्यय येईल असा मला विश्वास वाटतो.

दे. भ. धोंडोपंत देशपांडे ह्यांनीं अत्यंत परिश्रमपूर्वक बाबा-साहेबांचें चरित्र सरळ व सुस्पष्ट रीतीने लिहिलें आहें. ह्या चरित्राला प्रस्तावना लिहावयास खरें पाहिलें असतां मी पात्र नाहीं. लोकनायक अणे, वा श्री. यशंवत गोविंद उर्फ अण्णासाहेब देशपांडे हे ह्या चरित्रास प्रस्तावना लिहावयास योग्य होते. परंतु लोकनायक अणे आज सिलो-नला आहेत व श्री. अण्णासाहेब देशपांडे हे जवळचे आप्त आहेत. परंतु बाबासाहेबांच्या अंतरंगांत त्यांना जितका प्रवेश करितां आला

असतां तितका मला करतां येणें शक्य नाहीं. परंतु कै. बाबासाहेबां-विषयी आपल्या मनांतील पूज्य बुद्धि व्यक्त करण्याची आलेली संधि घालविणें ह्यासारखें पाप नाहीं असें वाटून वऱ्हाडला यंत्रसज्ज उद्योगाचें सामुदायिक जीवन सक्रीय शिकविणारा पहिला वऱ्हाडी म्हणून बाबा-साहेबांच्या स्वर्गस्थ आत्म्यावर आदराचीं दोन फुलें उधळणें व अशाच भावी पुरुषांनी विदर्भ नटला जावो अशी इच्छा धारण करणें आवश्य-कच होते.

टिळकाश्रम; उमरावती.
ता. २५-३-१९४४

**ना. रा. बामणगांवकर**
संपादक ' उदय. '

# कै. व्यंकटराव हणमंतराव उर्फ बाबासाहेब देशमुख




जन्म


ता. १८ जून, सन १८६८ इ.

मृत्यु

ता. २२ एप्रिल, सन १९२१ इ.

हस्तलिखित कॉपी नमूना ( मराठी )





दी विदर्भ मिल्स, एलिचपूर लिमिटेड, ( वऱ्हाड )

|| श्रीरुक्मिणी पांडुरंग समर्थ ||



# कैलासवासी बाबासाहेब देशमूख

१

## घराण्याचा त्रोटक इतिहास.

देशमूख हें नांव घेतांच साधारणतः हे मराठा क्षत्रियाचें घराणें असावें असें कोणासहि प्रथमदर्शनीं वाटतें. पण विदर्भ प्रांतांत ( वऱ्हाडांत ) वतनदार ब्राह्मण देशमुखांचीं नांवाजलेलीं दोन चार घराणीं आहेत. त्यांपैकीं इलिचपूरच्या प्रसिद्ध देशमूख घराण्यांत चरित्रनायकाचा जन्म झाला.

चरित्रनायकाचे मूळ पुरुष **मघो विठ्ठल** हे बेदरला राहत असत. यांचें उपनांव बल्लाळ. यांनीच देशमुखी वतन कमावलें. देशमुखी वतन म्हणजे वाढोणें जाहागीर गांव. वऱ्हाडांत मोंगलांचा अम्मल सुरू होण्याच्या अगोदरपासून इलिचपूरच्या ब्राह्मण देशमुखांनी हें वतन

कमावलें आहे. या बाबतींत उमरावती डिस्ट्रिक्ट गॅझेटियर पान १५६ वर उल्लेख केला आहे. परिशिष्ट १ मध्ये गॅझेटियरचा उतारा दिला आहे.

चरित्रनायकाच्या वडिलांचें नांव **हणमंतराव उर्फ आप्पासाहेब** यांना संस्कृत व फारशी भाषेचा चांगला व्यासंग होता. सध्यां जशी इंग्रजी भाषेची जरूरी आहे तशी त्या वेळीं फारशी भाषेची आवश्यकता होती. दरबारांत फारशी विद्वानाला मोठा मान असे. आप्पासाहेबांच्या मातुश्री वऱ्हाडांतील सुरजी अंजनगाव येथील देशपांडे घराण्यांतल्या. देवनाथ महाराजांच्या अलौकिक चारित्र्याने सुरजी अंजनगांव अजून लोकांच्या स्मृतिपटलांत कायम आहे. आप्पासाहेबांच्या मातुश्रीला जिजीबाई उर्फ मोठ्या बाईसाहेब म्हणत.

आप्पासाहेबांचें **प्रथम कुटुंब** म्हणजे इलिचपूरच्या सुप्रसिद्ध नबाब साहेबांचे दिवाण केशवराव अनाजी देवडीवाले यांची कन्या. त्यांच्या अकालिक निधनानंतर आप्पासाहेब यांचा **द्वितीय संबंध** वऱ्हाडांतील प्रसिद्ध अमडापूरकर देशपांडे नारायणराव यांची कन्या **राधाबाई** यांचे बरोबर झाला. वऱ्हाडांतील वतनदारांत पहिले बी. ए. होण्याचा ज्यांना मान मिळाला त्या कै० श्री० रा० रा० रामचंद्र नारायण उर्फ भाऊसाहेब देशपांडे यांच्या राधाबाई जेष्ठ भगिनी. चरित्रनायकाच्या मृत्युसमयीं त्यांचें वय ८१ वर्षांचें होतें. या वयांत सुद्धां अध्यात्म-रामायण व भगवत्‌गीता त्या स्वतः वाचीत होत्या. त्यांनी अनेक धार्मिक ग्रंथ व पुराणें स्वतः वाचलीं व ऐकलीं.

आप्पासाहेब यांना एक बहीण होती. त्यांचें नांव सौ० गंगाबाई. यांचा अंजनासिंगीकर श्री. रा. रा. गोविंदराव बापूसाहेब देशपांडे यांच्या बरोबर विवाह झाला. गोविंदराव यांना नारायणराव उर्फ दादासाहेब, केशवराव उर्फ भाऊसाहेब, निळकंठराव उर्फ दाजीसाहेब, यशवंतराव उर्फ अण्णासाहेब व गोपाळराव उर्फ नानासाहेब असे पांच पुत्र होते.

आप्पासाहेब देशमुखांनी देशमुखी वतनाची तसेंच आपल्या मिळकतीची आपल्या हयातींत चांगली व्यवस्था लावली होती.

आप्पासाहेब वारल्यानंतर त्यांच्या सर्व मिळकतीचा कारभार त्यांच्या मातुश्री जिजीबाईसाहेब पाहत होत्या. त्या व्यवहाराला अत्यंत दक्ष असून, त्यांचा दरारा दांडगा होता. असें होतें तरी त्यांचें सुनेवर अत्यंत प्रेम होतें. सासू-सुनेचें उत्तम असल्यामुळे जिजीबाईसाहेब जें जें करीत त्याची माहिती राधाबाईला झाली. पतीचें सुख राधाबाईला फार दिवस लाभलें नाहीं. इतकेंच नव्हे तर दुर्दैवानें प्रेमळ सासूचा सहवासहि बाईला फार दिवस लाभला नाही. सासूच्या पश्चात त्यांचेंच अनुकरण राधाबाईनें केलें. त्यामुळे त्यांची कारकीर्द फारच शिस्तीची सचोटीची व वतनदाराला अनुरूप अशीच झाली.

## २

## बालपण

चरित्रनायक **व्यंकटराव उर्फ बाबासाहेब देशमूख** यांचा जन्म ज्येष्ठ वा। १३ शके १७९० संवत १९२५ रोज गुरुवारीं

तारीख १८ जून १८६८ इसवी रोजीं इलिचपूर मुक्कामीं त्यांच्या राहत्या घरांत झाला.

हा काल वऱ्हाडांतील राजकीय, धार्मिक व आचारविचारांचा संक्रमण काल होता. संक्रमण कालीं साधारणतः प्रसिद्ध पुरुष जन्मास येतात अशी समजूत आहे. परिशिष्ट २ मध्ये चरित्रनायकाची जन्म-कुंडली व राशीकुंडली दिली आहे. ती पाहतांच ही कोणातरी प्रसिद्ध पुरुषाची कुंडली असली पाहिजे असें तज्ञास सहज दिसून येईल. चरित्रनायकाचा जन्म होतांच घराण्यांतील सर्व मंडळींस अत्यानंद झाला. याचें कारणहि उघडच होतें. बरेंच वर्षांत या घराण्यांत लहान मूल नव्हतें. वंशवृद्धीच्या या सुयोगानें सर्वांना आनंद होणें साहजिकच होतें.

जगांत आपण नेहमी पाहतों कीं सुखदुःखाची सारखी शर्यत लागली आहे. एखाद्या कुटुंबाला सुखाचा काल लाभला कीं दुःख दत्त म्हणून त्याच्या दारांत उभें असतें. दुःखांतून सुखाचे दिवस यायला फार काळ लागतो. पण सुखांतून दुखाचे दिवस फार लौकर येतात असा जगांतला सर्व साधारण नियम आहे. या नियमाला देशमुख घराणें अपवाद कसें असूं शकेल ?

पुत्रप्राप्तीच्या आनंदांत या घराण्यांतील सौभाग्यलक्ष्मी राधाबाई सुखाच्या शिखरीं असतांना परमेश्वराच्या मनांत त्यांना तेथून ढकलावेसें वाटलें. प्रेमळ सासू-सुनांना आनंदांत पाहून त्यांना दुःखाच्या दरींत लोटावेसें वाटलें. असें करण्यांत देवाचा काय हेतु असावा हें अज्ञ माणसाला कसें कळणार ? बाबासाहेब वर्ष दीड वर्षाचे असतांनाच

त्यांचे वडील आप्पासाहेब कैलासवासी झाले. चरित्रनायकाच्या संगोपनाची त्याचप्रमाणें सर्व स्थावर जंगम मिळकतीच्या कारभाराची जबाबदारी जिजीसाहेबांवर पडली. त्यावेळी आजीच्या मनाला केवढा भयंकर धक्का बसला असेल याची कुणाला कशी जाणीव करून द्यावी ? आलेल्या दुर्धर प्रसंगाला तोंड देण्याशिवाय गत्यंतरच नसल्याने जिजीबाई साहेबांनी कारभाराचीं सर्व सूत्रें पुन: ताब्यांत घेतलीं.

या वेळीं रुसुमासुद्धां एकंदर उत्पन्न अंदाजा सालीना साडेचारहजारांचें होतें. जिजीबाईसाहेबांनी आपल्या हयातींत मिळकतीची व्यवस्था अत्यंत कुशलतेने व चोख रीतीने केली.

त्या काळच्या धार्मिक परिस्थितीच्या मानाने, धार्मिक प्रवृत्तींचा व्यासंग बाबासाहेबांना अगदी बालपणापासून, जिजीसाहेबांनी लावला. बाबासाहेबांच्या धार्मिक प्रवृत्तीच्या विशाल वृक्षाचें बीजारोपण जिजीबाईसाहेब यांनी केलेलें होतें. आईपेक्षा कुण्याहि मुलाला आजीचा लळा जास्त असतोच. वयाच्या दीड वर्षी पितृवियोग, ज्यांनी अत्यंत प्रेमळपणाने संगोपन केलें त्या आजीचा वयाचे पंधरावे वर्षी वियोग. अशा परिस्थितींत चरित्रनायकाचें बालपण संपलें.

राधाबाईला सासुरवास कसा तो माहीत नव्हता. लहान वयांत पतीच्या निधनानंतर जिजीबाईसाहेबासारखी कुशल, दक्ष, व्यवहारचतुर व प्रेमळ सासू कांही वर्षें तरी लाभली हीच देवाची कृपा समजावयाची. पण देवाला हेंहि फार दिवस रुचलें नाही. जिजीसाहेब यांच्या पश्चात् सर्व जबाबदारी बाईसाहेब ( बाबासाहेबांच्या मातुश्री ) राधाबाई यांच्यावर पडली.

आपल्या सासूइतक्याच दक्षतेने त्यांना देखील बाबासाहेबांच्या धार्मिक तसेंच इतर शिक्षणाची व्यवस्था केली.

इस्टेट पाहण्याचें काम बाईसाहेब आपल्या देखरेखीखालीं मुखत्यारामार्फत करीत. बाईसाहेबांनी १८८७–१८८८ सालापावेतों देखरेख केली.

या काळांत त्यांच्यावर अनेक दुर्धर प्रसंग ओढवले. पण त्यांनी या सर्व प्रसंगांना अत्यंत धैर्याने तोंड दिलें. या त्यांच्या कारकिर्दीत त्यांच्यावर एक फारच बिकट प्रसंग आला. जांभळ रामापूर येथील शेतीचा वायदा भरण्याइतक्या रकमेची सोय होऊं शकली नाही म्हणून मुखत्यार दाजीसाहेब यांनी ती शेती सरकारांत वापस देणेंसाठी अर्ज लिहिला. हा अर्ज दाजीसाहेबांनी बाईसाहेब यांच्या सहीला आणला. बाईसाहेबांनी या अर्जावर सही केली नाही. जें काम दाजीसाहेबासारख्या चतुर मुखत्याराला करता आलें नाही तें बाईसाहेबांनी करून दाखविलें. वायदा भरण्यासाठी त्यांनी कोठून रकम आणली, ती कशी आणली, हें कुणालाहि कळलें नाही. सरकारांत जाणारी जमीन त्यांनी अशा तऱ्हेने वाचवली.

बाबासाहेब साधारणतः जन्मापासूनच अशक्त. पांच वर्षांपावेतों ते निरोगी असे कधींच नव्हते. त्यांच्याविषयीं जिजीसाहेब व बाईसाहेब यांना नेहमी फारच काळजी वाटत असे. बाबासाहेब निरोगी व्हावेत म्हणून त्यांनी धार्मिक व वैद्यकीय उपायांची पराकाष्ठा केली. सर्वेश्वराला सासु-सुनांची सेवा पटली. वैद्याच्या उपचाराला यश आलें. जिजीबाई-

साहेब, व बाईसाहेब यांना आनंद झाला. बाबासाहेबांच्या प्रकृतींत फरक पडला; व वयाच्या पांचव्या वर्षापासून ती सुधारत चालली.

बाबासाहेब शरीराने मोठेसे धडधाकट नव्हते. त्यांचा बांधा ठेंगणा असून ते साधारण सडपातळच होते. नियमितपणामुळे त्यांची प्रकृति चांगली राहत होती व त्यांचा उत्साहहि कायम राहत असे. शरीर सुदृढ व निरोगी राहण्याला नियमितपणाशिवाय दुसरें साधनच नाही.

प्रकृति सुधारल्यानंतर बालपणीं बाबासाहेब नेहमी घोड्यावर बसत. तसेंच ते लहान मुलांचे सर्व खेळ खेळत असत.

परसांत किंवा अंगणांत लहान मोठीं झाडें लावण्याचा बालपणांत सर्वांना बहुधा नाद असतोच. तसाच नाद बाबासाहेबांनाहि होता. पण इतर मुलांसारखा गुलबास, तेरडा किंवा अशा तऱ्हेचीं चैनीसाठीं फुलझाडें लावण्याचा त्यांना नाद नव्हता. आपल्या अंगणांत किंवा परसांत फुलाफळांचीं झाडें त्यांना नको होतीं असें नाही. तीं त्यांना हवींच होतीं. पण या शिवाय त्यांना दुसरीं झाडें हवीं होतीं. ते खेळण्यासाठीं बाईसाहेबांजवळून कांही जिनसा घेत. तसेंच बाईसाहेबांना खेळण्यासाठीं कधी कधी पैसे, रुपयेहि मागत. एकदा बाईसाहेबांनी विचारलें– " बाबासाहेब ! या रुपयांचें तूं काय करणार ? "

" काय करणार ? मग सांगेन ", असें म्हणून आई जवळून प्रसंगोपात, तसेंच आजी जवळूनहि रुपये घेऊन जावेत.

हे रुपये त्यांनी खड्डा खोदून त्यांत पुरावेत. कांही वेळाने आईला व आजीला येऊन सांगावें, " बाई ! आजी ! मी आज किती रुपयांचीं झाडें लावलीं आहेत. आता तीं निघतील व आपल्या आंब्याच्या झाडाला जसे आंबे लागतात नाही, तसे माझ्या रुपयांच्या झाडाला रुपये लागतील. आंब्याला धोंडे मारून लोक आंबे पाडतात तसा मी रुपयांच्या झाडांना दगड मारीन व रुपये पाडीन. माझ्या दगडाने रुपयांचा मग सडा पडेल. झाडावरून रुपये खाली पडतांना, आजी ! छन, छन, असा आवाज होईल; नाही ? "

'पोराचे पाय पाळण्यांत,' अशी आपल्यांत म्हण आहे. बालपणीं ज्या बाबासाहेबांना रुपयांचीं झाडें लावण्याचा नाद होता. त्यांनी जर आपल्या हयातींत संपत्ति वाढवली नाही तर दुसरा कोण वाढवणार ? वरील म्हण " पोराचे पाय पाळण्यांत " ही बाबासाहेबांचे बाबतींत खरी ठरली.

बाबासाहेबांनी घरचा कारभार स्वतः हातांत घेईपावेतों त्यांच्या घरचा सर्व कारभार चालत असे. रा० नारायणराव उर्फ आप्पाजी सरमसखाने, रा० तुकारामपंत वारानीकर, व रा० रंगरावबाबा यांनी बरींच वर्षे पावेतों कारभार पाहिला. यांच्या सहवासांतच बाबासाहेब यांचें बालपण गेल्याने वरील कारभारी यांच्या सांनिध्याने, सहवासाने व त्यांच्या अंगच्या धार्मिक व व्यावहारिक गुणामुळे व बाबासाहेबांच्या ठिकाणीं धार्मिक प्रवृत्ती, व्यवहारकुशलता, तात्कालिन परिस्थितीच्या मानाने राहण्याची शैली वगैरे बाबतींत प्रगति होत गेली. अशा तऱ्हेने पुढील आयुष्यक्रमाचा कायमचा पाया बालपणींच भरला गेला.

इसवी सन १८८४ मध्ये बाबासाहेबांचे मामा कै० भाऊसाहेब देशपांडे अमडापूरकर यांच्या सल्ल्याने रा० रा० निळकंठराव उर्फ दाजीसाहेब चिखलीकर देशपांडे यांची मुखत्यार म्हणून नेमणूक झाली. रा० दाजीसाहेब यांनी मुखत्याराचें काम आपले हयातीपर्यंत म्हणजे सन १९२६ पावेतों केलें. रा० दाजीसाहेब म्हणजे प्रामाणिकपणाचें दृश्य उदाहरण. शेवटीं शेवटीं ते अशक्त व वृद्ध झाल्यामुळे बाबासाहेब यांनी त्यांना पेन्शन दिलें होतें. बाबासाहेबांच्या उत्कर्षाला जीं अनेक कारणें आहेत त्यांत रा० दाजीसाहेब यांचा प्रामाणिकपणा याला बरेंच वरचें स्थान आहे.

बाबासाहेबांची मुंज त्यांच्या वयाच्या आठव्या वर्षीं झाली. या नंतर त्यांच्या खाजगी व इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली.

# ३

# शिक्षण व विवाह

इलिचपूर येथे बाबासाहेबांचें शिक्षण इंग्रजी तिसरीपावेतों झालें. बाबासाहेब यांचा व अंजनसिंगीकर देशपांडे यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा व निकटचा संबंध असल्याने दोन्ही घराण्यांतील मुलांचें शिक्षण लहान असतांना इलिचपूर येथे व नदनंतर उमरावतीस बरोबरच झालें.

त्या काळीं वऱ्हाडांत वतनदार मंडळींत फारच लहानपणीं लग्नें होत असत. त्या काळच्या रीतीप्रमाणें बाबासाहेब उमरावतीला शिक्षणा-साठी जाण्यापूर्वीच त्यांचें लग्न झालें.

बाबासाहेबांच्या प्रथम पत्नीचें नांव सौ. पार्वतीबाई. या आष्टी-आमनेर येथील प्रसिद्ध कै. रा. रा. अंबादास आत्माराम उर्फ बाबासाहेब देशपांडे यांच्या कन्या. यांचीच धाकटी बहीण श्री. रा. रा. अण्णासाहेब देशपांडे अंजनसिंगीकर ॲडव्होकेट—उमरावती—यांना दिली होती. रा. अण्णासाहेब यांच्या पत्नीचें नांव सौ. गिरिजाबाई.

बाबासाहेबांची प्रथम पत्नी सौ. पार्वतीबाई या लग्नानंतर फारच लौकर स्वर्गवासी झाल्या.

त्यानंतर इलिचपूरचे प्रख्यात व वऱ्हाडांतील पहिले रावबहादूर भगवंतराव बापूसाहेब देशपांडे इलिचपूर यांची कन्या बाईमाय श्री० जानकीबाईसाहेब यांचे बरोबर बाबासाहेबांचा द्वितीय संबंध झाला. लग्नाच्या वेळीं बाईमायचें वय अवघें सहा वर्षांचें होतें. श्री० जानकीबाई कै० रावसाहेब पुरुषोत्तमराव उर्फ रावसाहेब देशपांडे यांच्या कनिष्ठ भगिनी. या लग्नाच्या वेळेला बाबासाहेब यांचें वय १५ वर्षांचें होतें.

या लग्नानंतर लौकरच पाथरी परभणी येथील जाहागीरदार कै० भगवंतराव रावसाहेब चौधरी यांची कन्या कोंडाबाई—श्री० सरस्वती-बाईसाहेब यांच्याबरोबर बाबासाहेब यांचा तृतीय संबंध झाला.

इलिचपूर येथील शिक्षण संपल्यानंतर हायस्कूलचें शिक्षण घेण्यासाठीं बाबासाहेब उमरावतीला गेले. मध्यंतरीं सुटींत ज्या ज्या वेळीं ते इलिचपुरास येत त्या त्या वेळीं ते आपल्या मिळकतीची देखरेख करीत.

हायस्कुलांत ते दहाव्या वर्गात असतांना त्यांचा शिक्षकाबरोबर खटका उडाला. कुणी एका विद्यार्थ्याने एका शिक्षकाबरोबर खोडसाळपणाचें वर्तन केल्यामुळे त्या शिक्षकाने वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षा करण्याचें ठरविलें. शिक्षा घेण्याचा जेव्हा बाबासाहेबांवर प्रसंग आला तेव्हा त्यांनी शिक्षकाला सांगितलें:—" मी गुन्हा केला नाही. गुन्हा कोणीं केला हें मला माहीत आहे. मी त्या विद्यार्थ्याचें नांव सांगणार नाही. मी स्वतः गुन्हा केला नाही म्हणून अन्यायाची शिक्षा घेण्याला मी तयार नाही. बाबासाहेबांच्या या सरळ उत्तराने शिक्षकाची व बाबासाहेबांची बरीच तक्रार झाली. शेवटीं शिक्षकाने इतर विद्यार्थ्यांप्रमाणें बाबासाहेबांनाहि शिक्षा घेण्यासाठी बोलाविलें. बाबासाहेबांनी शिक्षा घेण्याचें नाकारलें व त्यामुळे त्याच क्षणीं त्यांना शाळेंतील शिक्षणाला मुकावें लागलें. अशा प्रकाराने त्यांना शाळा सोडण्याचा प्रसंग आला नसता तर बाबासाहेबांचें शिक्षण पुष्कळ झालें असतें. त्यांना किती तरी डिग्र्या मिळाल्या असत्या. कारण शाळेंत त्यांचा नंबर बहुधा वरच असे. त्यांची बुद्धि तीव्र असल्याने त्यांना कोणताच विषय कठीण असा वाटत नसे, त्यांचे सर्व विषय सारखे होते.

शाळा सोडली त्यावेळेला त्यांचें वय एकवीस बावीस वर्षांचें होतें. त्यांच्या हस्ताक्षराचा नमुना पुस्तकांत स्वतंत्र दिला आहेच.

## भाऊबंद

बाबासाहेबांना भाऊबंद असें एकच घराणें आहे व त्याचा संबंध नऊ दहा पिढ्यांपूर्वीचा आहे. हें घराणें दोन बंधूंचें. श्री० के०

आप्पासाहेब व श्री० तात्यासाहेब देशमुख. आप्पासाहेब उमरावतीस राहत होते. त्यांच्या पत्नी सौ. कै. ( सुंदराबाई ) ह्या बाळापूरकर देशपांडे घराण्यांतल्या.

आप्पासाहेब यांचे धाकटे बंधु रा० रा० तात्यासाहेब इलिचपुराला राहतात. कै० श्री० दादासाहेब पांगरकर यांचे हे जावई. दोन्ही घराण्यांचे संबंध प्रेमाचे आहेत.

## ५

# मिळकतीची व्यवस्था

बाबासाहेब हायस्कूल सोडून इलिचपुराला आले व त्यांनी इस्टेटीचा कारभार पाहण्यास सुरुवात केली. यावेळीं त्यांचें वय २१-२२ वर्षांचें होतें. त्यांनी आपली सर्व शेत जमीन स्वतः पाहून घेतली व त्या जमिनींची सर्व्हेअरमार्फत मोजणीहि करून घेतली. आपल्या जमिनींचे नकाशे वगैरे त्यांनी स्वतः तयार केले.

याचवेळीं वाढोणा जाहागीर गावाचा तंटा चालू होता; व या तंट्याचा शेवटचा निकाल सन १८९७ सालीं बाबासाहेबांना अनुकूल असा झाला. या तंट्याच्या यशस्वी निकालाचें सर्व श्रेय बाबासाहेबांचे मुखत्यार रा० दाजीसाहेब व आबासाहेब यांचे मामा कै० श्री. रा. रा. भाऊसाहेब अमडापूरकर यांना आहे.

बाबासाहेब यांनी इस्टेटीचा कारभार हातीं घेतला त्यावेळीं इलिचपुरांत गढीकर व साधू हीं दोन घराणीं वतनदार देशमुख, देशपांडे, घराण्यांप्रमाणेंच प्रख्यात होतीं. याचें कारण त्यांच्या जवळ वतनदार घराण्याचे तसेच इतर महत्त्वाचे जुने कागदपत्र होते. असें असून देखील या दोन्ही घराण्यांचा जिजीबाईसाहेब व राधाबाईसाहेब यांच्या कारकिर्दीत देशमुख घराण्याच्या कारभारांत शिरकाव झाला नव्हता व त्यांचें एलिचपूर येथील देशमुख देशपांड्यांच्या घराण्याप्रमाणें प्रस्थहि नव्हतें. तीच स्थिति बाबासाहेबांच्या कारकीर्दीतहि कायम होती. पण कांही दिवसांनी बाबासाहेब यांनी दोन्ही घराण्यांशीं प्रेम संपादन करून आपल्या घराण्याविषयीं त्यांच्या ठिकाणीं आदरभाव उत्पन्न केला.

कारभार हातीं घेतल्याबरोबर बाबासाहेब यांनी खालील गोष्टी केल्याः—

१. आपलें घरचे सर्व कागदपत्र त्यांनीं व्यवस्थित लावले व यापुढें रेकॉर्ड ( कागदपत्र ) कसें लावावयाचे व हिशेब कसें ठेवावयाचे याची त्यांनीं शिस्त घालून दिली. तीच पद्धति अजूनहि चालू आहे.

२. आपल्या मिळकतीच्या उत्पन्नाचें व खर्चाचें त्यांनी अंदाजपत्रक केलें, व शक्यतोंवर त्याप्रमाणें चालण्याची त्यांनी पद्धति ठेवली.

३. शेतीची जरूर ती सुधारणा करून, तशीच पडीत शेती वहितीस आणून शेतीचें उत्पन्न वाढविण्याचा त्यांनी जोराचा प्रयत्न केला. त्यांत त्यांना यशहि आलें.

४. जाहीर लिलावाने शेती लागवडीस देण्याची नवीन पद्धत सुरू केली.

५. उत्पन्न वाढविण्यासाठीं त्यांनी लहान प्रमाणावर देवघेवीचा धंदा सुरू केला.

६. हळूंहळूं देवघेवीच्या धंद्यांचें प्रमाण वाढलें व ते देवघेवींत शेती वगैरे गहाण घेऊं लागले.

७. वसूलीच्या बाबतींत दक्षता व खर्चावर करडी नजर ते स्वतः ठेवूं लागले.

८. प्रत्येक कुळाबरोबर प्रत्यक्ष स्वतः व्यवहार करावयाला व त्याची पूसतपास करावयाला त्यांनीं सुरुवात केली.

९. वेळच्यावेळीं कामकाज व हिशेब ठेवण्याची ते काळजी घेत.

नुसता शेतकरी समाजांत फार पुढें येऊं शकत नाही. शेतीच्या जोडीला व्यापार हवा म्हणून त्यांनी कारभार पाहत असतांनाच उद्योग-धंद्यालाहि सुरुवात केली व त्याच बरोबर ते सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यांतहि भाग घेऊं लागले. त्यांनी अत्यंत अल्प अवधींत आपल्या प्रेमळपणानें व करारी स्वभावानें गावांत व वऱ्हाडांत बराच लौकिक संपादन केला. त्यांच्या अंगच्या सद्गुणांमुळे इलिचपूरच्या प्रत्येक धार्मिक, सामाजिक व सार्वजनिक बाबतींत जनता त्यांची सल्ला घेई. साहजिकच इलिचपूरचें नेतृत्व त्यांच्याकडे आलें, याचा परिणाम मात्र

अनिष्ट झाला. यांच्याशीं स्पर्धा करून यांच्या प्रत्येक कामांत यांना हाणून पाडून आपला वरचष्मा राहावा या विशिष्ट मनोरचनेचा एक प्रतिस्पर्धी गट निर्माण झाला व अखेरपर्यंत या गटांतील मंडळींबरोबर इच्छा असून सुद्धां त्यांना प्रेमाचे संबंध ठेवणें दुरापास्त झालें.

## ६

## सामाजिक कार्य

हा काल असा होता की त्यावेळीं वतनदार घराण्यांतील स्त्री पुरुषांच्या प्रत्येक हालचालीवर लोकांचें लक्ष्य असे. वतनदाराने गडी-माणूस बरोबर न घेतां बाहेर निघणें, सार्वजनिक कामासाठीं वर्गणी मागण्यास स्वतः फिरणें या गोष्टींची लोक उघड निंदा करीत. लोक-निंदेला न जुमानतां बाबासाहेब यांनी लायब्ररी या संस्थेचें पुनरुज्जीवन करण्याच्या कार्याला तसेंच लायब्ररीच्या इमारतीच्या कार्याला सुरवात केली. जनापवाद अथवा निंदा याची पर्वा न करतां गावांतील लहानमोठ्या इसमांच्या घरीं स्वतः जाऊन व वर्गणी जमवून लायब्ररीच्या इमारतीचें काम त्यांनी पुरें केलें. या कार्यांत बाबासाहेब यांनी तसेंच श्री० रा० रा० नरहरराव भगवंतराव उर्फ अण्णासाहेब देशपांडे व कै० भाऊसाहेब शास्त्री, वकील, यांनी स्वतः बरीच झीज सोसली. लायब्ररीचा उद्‌घाटन समारंभ मोठ्या थाटाने कर्नल मॅकेंझी जे पुढें हैद्राबादेला रेसिडेंट झाले त्यांच्या हस्तें झाला. बाबासाहेब यांनीं स्वतः लायब्ररींत बरींच वर्षें काम करून लायब्ररीची सांपत्तिक स्थिति सुधारली व ती लायब्ररी अजूनहि पूर्वीप्रमाणेंच व्यवस्थित चालू आहे.

साधारणतः कट्टर पुराणमताभिमानी व धर्माभिमानी थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे जुनें तेव्हढें चांगलें व नवें तेवढें वाईट, व धर्माच्या बाबतींत अत्यंत दुराग्रही अशी जनतेची बाबासाहेबांविषयीं सर्व साधारण समजूत होती; पण ती वस्तुस्थितीला धरून नव्हती. या विधानाला बाबासाहेबांच्या चरित्रांत पुष्कळ दाखले सापडतील. तितके सर्व न देतां एक दोन दाखले आम्ही देत आहोंत. असें करण्यांत एव्हढेंच सिद्ध करण्याचा आमचा हेतु आहे कीं, बाबासाहेब हे कट्टर नसून बुद्धीला पटेल त्याप्रमाणें वागण्यास तयार असत; व एकदां सर्व तऱ्हेनें विचार करून अमकी गोष्ट सत्याला व धर्माला धरून आहे अशी त्यांची खात्री झाली कीं, विरोधाची पर्वा न करतां ते आपल्या निश्चयापासून ढळत नसत.

श्री० विसरोळीकर देशमूख यांचा विवाह पत्नीच्या रजोदर्शनानंतर तिला धर्मरीत्या शुद्ध करून घेतल्यावर झाला. हा विवाह धर्मबाह्य आहे असा वाद उत्पन्न होऊन त्यामुळे इलिचपूरला एक मोठें ग्रामण्य माजलें. यांत बाबासाहेब यांनी श्री० विसरोळीकर देशमूख यांची बाजू घेतली. ते केवळ कट्टर असते. तर त्यांनी ही बाजू घेतली नसती. या प्रकरणांत इलिचपूरचे प्रसिद्ध वे० शा० सं० कै० रामशास्त्री महाराज शेवाळकर यांचा व बाबासाहेब यांचा संबध आला. वे० शा० सं० रामशास्त्री महाराज यांना मूळचा रावसाहेब देशपांडे यांच्या वडीलांचा व तदनंतर रावसाहेब देशपांडे यांचा आधार. पण या विसरोळीकर देशमुखांच्या प्रकरणापासून महाराजांचा व बाबासाहेबांचा स्नेहसंबंध जुळला सध्या महाराजांच्या मठाची जी जागा आहे ती बाबासाहेब व

कै० भाऊसाहेब अमडापूरकर यांनी घेऊन दिली. तेव्हापासून शेवाळकर महाराज यांचें इलिचपूर येथे कायमचें वास्तव्य झालें. महाराजांनी आपल्या विद्वत्तेच्या, ज्ञानाच्या व बहुश्रुत-पणाच्या जोरावर येथे बरीच शिष्यशाखा केली. महाराजांना येथील व बाहेरील गावच्या सुशिक्षित वर्गांत सुद्धां बराच मान होता. बाबासाहेबांच्या ठिकाणीं महाराजाविषयीं शेवटपर्यंत अत्यंत आदरबुद्धि वसत होती, व महाराजांविषयीं त्यांची श्रद्धा कायम होती. या ग्रामण्य प्रकरणामुळें, बाबासाहेब यांचेवर यांच्या मित्रांपैकी बरेच जण रागावले, व कांहींनी तर यांचा पक्षहि सोडला. कालावधीने ग्रामण्य आपोआप मावळलें.

वरच्या सारखेंच आणखी एक ग्रामण्य प्रकरण येथे उपस्थित झालें. तें म्हणजे " आरोपित अभीर संज्ञक यजुः शाखीय " वर्गाविषयीं. या प्रकरणांत देखील बाबासाहेब यांनी जगद्गुरू शंकराचार्य संकेश्वर व शृंगेरी मठ यांचा निर्णय मान्य करून या वर्गाबरोबर पूर्वीपासून चालू असलेला पंक्तिव्यवहार कायम ठेवला. यामुळे देखील वाद उत्पन्न होऊन मोठें ग्रामण्य माजलें. या ग्रामण्यामुळे देखील बाबासाहेब यांना आपल्या पुष्कळ स्नेह्याबरोबर व आप्तस्वकीयाबरोबर विरोध करावा लागला. प्रथमतः त्यांचें बाजूस असलेले कांही स्नेही व आप्त कांही वेळानें विरुद्ध पक्षाला मिळाले. यामुळे बाबासाहेबांना गैरसोई, अडचणी, व प्रसंगोपात अपमान अशा सर्व प्रसंगाला तोंड द्यावें लागलें. इतक्या थराला गोष्टी गेल्या तरी देखील त्यांनी आपला सत्पक्ष सोडला नाही. हें ग्रामण्य कालांतराने नामशेष झाले हे निराळें .

लायब्ररीच्या सार्वजनिक कार्यांत पडल्यानंतर बाबासाहेबांनी येथील सिटी म्युनिसिपालिटीच्या कामांत प्रवेश केला. त्यांनी म्युनिसिपालिटीच्या

कारभारांत रेकॉर्डच्या बाबतींत वसुलाच्या बाबतींत, कर बसविण्याच्या बाबतींत बरीच सुधारणा घडवून आणली. म्युनिसिपालिटी ही आपली संस्था आहे याची त्यांना पूर्ण जाणीव असल्याने म्युनिसिपालिटींत अनाठाई खर्च न होईल याविषयी ते अत्यंत दक्ष असत. रस्ते, पाणी, सफाई, वगैरे, जेणे करून जनतेची सोय अधिक होईल या विषयीं ते काळजी घेत व लोकांच्या तक्रारीची वेळीच पूर्ण चौकशी करून ते निकाल करीत. त्यांनी ऑनररी सेक्रेटरी म्हणून काम केल्यानंतर ते बरीच वर्षे व्हाइस चेअरमन होते. त्यावेळी चेअरमन सबडिव्हिजनल ऑफिसर असत. चेअरमन स्वतः म्युनिसिपालिटीनें निवडून द्यावा. हा अधिकार त्यावेळीं म्युनिसिपालिटीला मिळाला नव्हता. म्युनिसिपालिटींतून त्यांनी आपलें अंग काढून घेतलें त्यावेळीं म्युनिसिपालिटीची सांपत्तिक स्थिति अत्यंत समाधानकारक होती. म्युनिसिपालिटींत असतांना त्यांनी बरीच लोकप्रियता संपादन केली.

म्युनिसिपालिटींत असतांना ते तालुका व जिल्हा बोर्ड या संस्थांतहि होते. तेथेहि त्यांनी जरूरीच्या सुधारणा घडवून आणल्या. परतवाडा येथे हायस्कूल असल्याने इलिचपूरच्या विद्यार्थ्यांना बरीच गैरसोय भासत असे. ती दूर व्हावी म्हणून बाबासाहेब यांनी इलिचपूर येथे नवीन हायस्कूलाची स्थापना केली. यावेळीं देखील त्यांनी स्वतः बरीच मदत केली व गावांतील धनिकांच्या घरीं स्वतः जाऊन स्वतः वर्गणी गोळा केली. आज अमुक इतकी वर्गणी गोळा करावयाची असें ठरवून ते घरून निघत व तितकी रकम वसूल झाल्याशिवाय ते घरीं जात नसत.

म्युनिसिपालिटी, लोकलबोर्ड या संस्थांत प्रवेश करून त्यांनी जशी लोकप्रियता संपादन केली त्याचप्रमाणें आपल्या चोख, सरळ व निःपक्ष-पाती-पणामुळे त्यांनी बेंच मॅजिस्ट्रेटच्या कामांत देखील बराच लौकिक संपादन केला.

सन १९०८ चा काल राष्ट्रीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. त्यावेळीं स्वदेशी बहिष्काराची चळवळ जोरांत होती. राष्ट्रीयशिक्षणाला, मुष्टीफंडाला वा पैसाफंडाला वर्गणी जंमविण्यासाठीं वऱ्हाडांतील पुढारी गावोगाव फिरत होते. हे पुढारी गावांतील मंडळींना घेऊन मोठमोठ्या धनिकांच्या घरीं वर्गण्या गोळा करण्यासाठीं जात. जी मंडळी या सत्कार्याला पुढाऱ्यां-बरोबर जात असे त्यांत बाबासाहेबहि होते. यावेळीं विदेशी कापडाची येथे होळी करण्यांत आली. बाबासाहेब यांचा म्युनिसिपालिटी, तालुका व जिल्हा बोर्ड, ऑ. मॅजिस्ट्रेट, साहुकार वगैरे बाबतींत लोकांशीं जास्त संबंध येत असे. यामुळे व त्यांच्या लौकीकामुळे त्यांचा उत्कर्ष कांहींना असह्य झाला. बाबासाहेब वतनदार असून राष्ट्रीय चळवळींत भाग घेतात, त्यांच्या घरीं विगर परवान्याची हत्यारें आहेत अशा तऱ्हेचा निनांवी अर्ज सरकारांत गेला. या निनांवी अर्जावरून बाबासाहेबांच्या घराची झडती झाली. झडतींत कांहींच मिळालें नाही. पण बाबासाहेबांचा स्वदेशी चळवळीशीं संबंध आहे असें गृहीत धरून या बाबतींत त्यांचें जहागीर वतन जप्त करण्याविषयीं कारवाई चालली. त्यांना बेंच मॅजिस्ट्रेटच्या जागेवरून दूर करण्यांत आलें. कालांतरानें निनांवी अर्जानें उत्पन्न झालेलें भूत कायद्याच्या कक्षेंत अथवा चौकटींत न बसल्याने त्यांच्या वरील आपत्ति टळली. योगायोग असा विलक्षण होता कीं, ज्या

अधिकाऱ्याने गैरसमजामुळे बाबासाहेबांना मॅजिस्ट्रेटीवरून दूर करण्याची शिफारस केली होती त्याच अधिकाऱ्याला मिळालेली माहिती ती देणाऱ्याने मत्सराने दिली होती असें खात्रीपूर्वक वाटलें, तेव्हा त्याने बाबासाहेबांना पुन: मॅजिस्ट्रेट नेमण्याविषयीं शिफारस केली व ते बेंच मॅजिस्ट्रेट झाले. त्यांनी कांही दिवस मॅजिस्ट्रेटचें काम केल्यावर ते स्वत: आपणहून त्यांतून मुक्त झाले हे निराळें.

## ७

# व्यापार

वऱ्हाडांत व त्यांतूनहि ब्राह्मण जमेदार घराण्यांत व्यापार करणें हा गौण पक्ष समजला जात असे. बाबासाहेबांनी जेव्हा आपला मोर्चा व्यापाराकडे वळविला तेव्हा उघडपणें पण थट्टेच्या सदराखालीं कांही जण त्यांना म्हणत "बनियेगिरी स्वीकारून आपण जमेदारीला बट्टा लावित आहांत. जमेदाराने बनिया होणें हा गौणपणा आहे. जमेदाराला हा कलंक आहे व कमीपणा आणणारें हें कृत्य आहे." अशा परिस्थितींत बाबासाहेबांनी उद्योगधंद्याला आरंभ केला.

त्यांनी प्रथमत: इलिचपूर येथे श्रीपांडुरंग जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी काढली. त्यांत त्यांनी श्री० कै० विठ्ठलराव दादासाहेब पांगरकर, श्री० कै० भाऊसाहेब शास्त्री वकील, कै० रा० अमृत शिवाजी, श्री० स० रा० नरहर भगवंत उर्फ आणासाहेब देशपांडे व कै० शेट

ग्रं. क्र. ६३५८

रामचंद्र इंद्रराज असे भागीदार घेतले. पुढे रामचंद्र शेटजी व आण्णा-सोहब देशपांडे यांचा हिस्सा बाबासाहेबांनी विकत घेतला. जीन व प्रेसचा कारभार त्यांनी अत्यंत चोख तऱ्हेने चालविल्यामुळे फॅक्टरी फायदेशीर झाली, व अजूनहि ती चांगल्या तऱ्हेने चालत आहे.

स्वदेशीच्या काळांत येथे शिवाजी छापाच्या आगपेट्यांचा कारखाना सुरू करण्यांत आला. या कारखान्यांत बाबासाहेबांनी पुष्कळ भांडवल घातलें होतें. परंतु पुढे कांही कालाने तो कारखाना किफायतशीर नसल्याने मॅनेजमेंटने तो बंद केला.

कांही वर्षांनंतर त्यांनी स्वतःचा एक जिनिंग प्रेस अंजनगांव येथें घातला. त्यावेळीं त्यांच्या मातुश्रीबाई म्हणाल्या "तुम्हाला लोखंडाचा फार नाद आहे.' यावर बाबासाहेब विनयाने उत्तरले की "बाई, मला लोखंडाचा नाद आहे हें खरें ! पण लोखंडाचा नाद, लोखंडाची चांदी करायची आहे म्हणून आहे. कांही कालाने प्रेसला भरपूर किंमत आल्याने त्यांनी तो विकून टाकला व अशा तऱ्हेने त्यांनीं लोखंडाची चांदी केली.

बाबासाहेब यांचे मावस बंधू श्री. रा रा. दादासाहेब पार्डीकर देशपांडे, सुरुवातीपासून शेवटपर्यंत या प्रेसची व्यवस्था पाहात होते.

प्रथमतः लहान प्रमाणावर सुरूं केलेला देवघेवीचा धंदा त्यांनी पुढे बराच वाढविला, व त्यांत त्यांना पुष्कळसें यशहि आलें.

अमरावतीला "जोशी, देशपांडे आणि कंपनी" नांवाचें कापड दुकान आहे. त्यांतहि बाबासाहेबांचा तिसरा हिस्सा आहे. व्यंकटेश सिल्व्हर शॉप व श्री. पांडुरंग ग्रेन शॉप अशी दुकानें त्यांनी अमरावतीला काढलीं. तीं बरेंच दिवस चालल्यानंतर त्यांतील भागीदाराच्या निधनामुळे

व एका भागीदाराने अंग काढून घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यामुळे तीं दोन्हीं दुकानें त्यांनी बंद केलीं.

आपल्या उत्पन्नाचा पुष्कळसा भाग त्यांनी शेअर्स, बॉंडस्, गव्हर्मेन्ट सिक्युरिटीज्मध्ये गुंतविला. याचें कारण ते असें सांगत कीं, ज्यांत मूळ रकम सुरक्षित राहील अशा ठिकाणीं कमी व्याज मिळालें तरी तें परिणामीं हितकर असतें. शिवाय हा पैसा रोकडीच्या स्वरूपांत असून तो अर्धरात्रीं कामास पडतो. सिक्युरिटीजवर बँकेकडून शेंकडा ८०–८५ टक्के कर्ज कमी व्याजाने मिळूं शकतें. शिवाय त्या विकावयाच्या असल्यास चालू भावांत तावडतोब विकल्या जातात.

अशा प्रकारें व्यापाराची सुरवात केल्यानंतर त्यांनी बँकेबरोबर व्यवहार करण्यास सुरवात करून आपली पत वाढवून घेतली. त्यांनी जसजसा धंदा सुरू केला तसतशी त्यांनी शेती देखील वाढविली, व घराचेंहि काम सुरू केलें. सध्या त्यांचें जें राहतें घर आहे त्याला स्वताईच्या काळांत अंदाजा २५ हजार रुपये लागले. हें घर वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध इंजिनीअर कै० रा० रा० सदाशिवराव भागवत यांचे देखरेखीखाली पूर्ण झालें.

## ८

# विदर्भ मिल एलिचपूर

बाबासाहेब यांनी निरनिराळ्या तऱ्हेने उद्योगधंद्यांत प्रगति केल्या-नंतर इ० स० १९०६ मध्ये त्यांचे मनांत स्वदेशीचा प्रसार होण्याला

हिंदुस्थानांत गिरण्यांची वाढ होणें इष्ट आहे अशा तऱ्हेचा विचार आला. वऱ्हाड प्रांतांत कापसाची निपज होते या दृष्टीने हा टापू गिरणीच्या धंद्याला बरा असेंहि त्यांना वाटलें. पण गिरणी काढणें हें सोपें काम नसल्याने व लहानशा गिरणीला देखील निदान बरेच लाख रुपये लागत असल्याने त्यावेळच्या विचाराला मूर्त स्वरूप आलें नाही. या विच.रानंतर बरींच वर्षेंपावेतों या बाबतींत वाटाघाट अशी झाली नाहीं.

इ० स० १९२२ च्या दिवाळीनंतर एके दिवशीं बाबासाहेब, व त्यांचे चिरंजीव व मोतीलाल अशीं पांच सात माणसें बसलीं असतांना मिल काढली तर स्वदेशीचा प्रसार या दृष्टीनें एका उपयुक्त संस्थेची भर पडेल, यावर चर्चा होऊन मिल जरूर काढली पाहिजे यावर सर्वांचें एकमत झालें. बाबासाहेबांनी त्यावेळीं इतकेंच म्हटलें कीं, " मिलबाबत मी बरेच दिवस विचार करीत आहे. पण पैशाची तशी सोय नसल्याने तो कृतींत आणतां येत नाही. पण मला आता असें वाटावयाला लागलें कीं, खटपट केली तर कदाचित् जमेलही; पण नक्की असें कांहीच सांगतां येणार नाही. तरीपण १० लाख शेअर्सचीं जर सुरवातीस वचनें मिळालीं तर पाहूं. "

तदनंतर बाबासाहेबांचा मिल हाच विषय बनला. त्यांनी याबाबतींत श्री० रा० रा० यशवंत गोविंद उर्फ अण्णासाहेब देशपांडे यांचा सल्ला घेतला व आपल्या स्नेही व परिचित मंडळींना पत्रें पाठवून या कल्पनेचा प्रसार केला. एवढेंच नव्हे तर लवकरच बऱ्याच जणांकडे ते स्वत: जाऊन विचार विनिमय करूं लागले. या बाबतींत श्री. प्रताप

शेटजींची सल्ला घेणेसाठीं ते मुद्दाम अमळनेरास गेले. प्रताप शेटजींचा व बाबासाहेबांचा यापूर्वी परिचय नव्हता. ते फक्त एकमेकांना नांवाने ओळखीत असत. पण मिलचें एवढें जोखमीचें काम आपण अंगावर घेण्याचें ठरलें तेव्हा या बाबतींत ज्यांना अनुभव आहे त्यांची सल्ला घेणें उचित होय असें त्यांनी ठरविलें. रा० रा० दामुअण्णा दलाल ( प्रताप मिलचे सेक्रेटरी ) यांचा व बाबासाहेबांचा अत्यंत परिचय असल्यामुळेंच त्यांनी अमळनेरला जाण्याचें ठरविलें. रा. रा. दामूअण्णांन व श्री० प्रताप शेटजींना त्यांनी आपला विचार कळविला. यावर श्री० प्रताप शेटजी म्हणाले, " बाबासाहेब, मिल काढणें कितीहि किफायतशीर असलें तरी मिल काढा असें मी कोणाला सांगणार नाही. कारणा मला फारच कटु अनुभव आला आहे. आम्ही व्यापारी लोक व्यापारांत नेहमी उच्ची मंदीचे दिवस पाहिलेले. मिलला उच्ची मंदीचे दिवस नेहमीच असणार व कोणत्या वेळीं कसा प्रसंग येईल तें सांगतां येत नाही. मजवर एकदां भयंकर आपत्ति ओढवली असतां मला माझ्या जातभाईंनी ऐनवेळीं द्रव्यसहाय्य केल्यामुळे माझी ठाकुरकी राहिली. आपण, वऱ्हाडी जमनिदार तसेंच वऱ्हाडांतील कांही पांढरपेशे व शेतकरी यांच्या भरवश्यावर भांडवल उभारून मिल काढणार. भांडवल उभारून तें आल्यानंतर एखाद्या अडीअडचणीच्या वेळीं तुम्हाला व्यापारी लोक, तुम्ही त्यांच्या जातीचे नसल्यानें द्रव्यसहाय्य करतील कीं नाही याची मला शंका वाटते. असें जरी आहे तरी फक्त आपणालाच मी मिल काढा असें याचें कारण एवढेंच की दीर्घोद्योग व कठीण प्रसंग आला असतां न डगमगतां त्याला तोंड देण्याची आपली शक्ति हे गुण आपल्या ठिकाणीं आहेत. शिवाय व्यापाराचें जें मुख्य तत्त्व काटकसर याचें शिक्षण

आमच्यासारख्या व्यापाऱ्यांनी आपल्या पासून घ्यावें असा आपला लौकिक आहे. आपण मिल जरूर काढा. मी आपणाला सर्व प्रकारें मदत करीन."

शेटजींचें सर्व म्हणणें ऐकल्यानंतर बाबासाहेबांनी त्याना एवढेंच सांगितलें कीं, " आपल्या मदतीच्या जोरावरच या मिलची उभारणी अवलंबून आहे. आपण स्पेशल डायरेक्टर व चेअरमन होण्याचें कबूल करीत असलां तरच मी मिलची जोखीम उचलण्याचें ठरवीन. कारण यांत कितीतरी गोरगरीबांजवळून मी पैसे आणणार आहे; व त्यांच्याकडून आणलेली रक्कम कालांतराने तरी त्यांना सव्याज परत देतां आली पाहिजे. स्वदेशीच्या प्रसाराला मदत व गोरगरीबांना पोटाचा धंदा, या दोन उद्देशाने मिल काढावी असें मी ठरविलें आहे. कारण देणेंघेणेंच्या धंद्यापेक्षां मिलचा धंदा फायदेशीर नाही. याची मला जाणीव आहे. " यावर श्री. प्रताप शेटजींनी बाबासाहेबांच्या म्हणण्याला रुकार दिला.

यानंतर रा० दामूअण्णा दलाल व श्री. आबासाहेब गाडगीळ-आकोल्याच्या सावतराम मिलचे सेक्रेटरी, यांचाहि बाबासाहेब यांनी सल्ला घेतला. यानंतर त्यांनी भांडवल कसें गोळा करतां येईल याविषयीं निश्चित धोरण ठरविलें, व मिल काढण्याला कमीत कमी किती रक्कम पाहिजे याचा अंदाज करून ठेवला. मिलच्या मांडणी-विषयीं तज्ञांजवळ चर्चा केली. उज्जनी, इंदूर, मुंबई, अहमदाबाद, आकोला, पुलगाव, नागपूर वगैरे ठिकाणीं स्वतः जाऊन मिलच्या धंद्याच्या दृष्टीनें त्यांनी तेथील मिल्स पाहिल्या. भांडवल किती मिळूं शकेल याची कल्पना त्यांना परिचित लोकांच्या भेटीने आली. मध्यप्रांताचे माजी गव्हर्नर

श्री० तांबे, श्री० अण्णासाहेब देशपांडे व श्री० प्रताप शेट यांची सल्ला घेऊन १९२३ मध्ये विदर्भ मिल रजिष्टर करण्यांत आली. एकावर्षाचे आंत निदान दहा लाख तरी शेअर्सचा वसूल आला पाहिजे. पण इतकें नाही तरी निदान सव्वासहा लाख म्हणजे २५ लाखांचा चौथा हिस्सा इतकी रकम हातीं येतांच मिलचे कामाला सुरवात करण्याचा त्यांनी निश्चय केला.

शेअर भरण्याचें काम व त्याच्या वसुलाचे काम हेंच अत्यंत महत्त्वाचें असल्यामुळें त्यांनी श्री. अण्णासाहेब देशपांडे यांना बरोबर घेऊन वऱ्हाडांत दौरा काढला. श्री. बाबासाहेबांचा सचोटीविषयीं फार लौकिक असल्याने ते ज्या ठिकाणीं गेले तेथें गरिबांपासून तो श्रीमंता-पावेतों सर्वांनी शेअर्स घेऊन त्यांच्या कार्याला प्रोत्साहन दिलें. ठिकठिकाणी मित्रमंडळींनी याकामीं फार मदत केली. श्री. अनंत रामचंद्र उर्फ बाळाभाऊ देशपांडे अमडापूरकर व श्री. दादासाहेब पारडीकर देशपांडे यांनी शेअर विकण्याच्या कामीं फार मदत केली.

निश्चित दहा लाख रुपये हातीं येतांच त्यांनी डायरेक्टरांच्या सल्याने मिलसाठीं जमीन खरेदी केली. यानंतर मिलचे प्लॅन्स् वगैरे काढण्याचें काम त्यांनी श्री. कृष्णराव देशपांडे अमडापूरकर यांचेकडून स्वत: करवून निदान १५ ते २० हजार रु. ची तरी सुरवातीसच बचत केली.

मिलच्या इमारती बांधणें, त्यांचे प्लॅन्स काढणें तीं कामें करवून घेऊन तीं प्लॅन बर हुकूम तसेच मजबूत व चांगलीं होतात कीं नाहीं

यावर देखरेख ठेवणें हें एखाद्या एंजिनीअरिंग फर्मचें काम बाबासाहेबांनी स्वत: करून या कामीं लागणारी ५०-६० हजार रु. ची रक्कम त्यांनी वाचविली.

बाबासाहेबांनी म्हातारपणीं देखरेखीचे श्रम करूं नयेत असें डायरेक्टरांपैकीं पुष्कळांनी त्यांना सुचविलें असतां त्यांनीं कळविलें कीं, “ आपण म्हणतां हें ठीक आहे. पण मिलचा पैसा मी गोरगरीबांकडून आणला असून त्यापैकीं एक पै देखील अन्नाठाई खर्च झाली तर तें मला बघवणार नाही. माझ्या शद्बावर ज्यांनी रकमा दिल्या त्यांचें हित पाहणें माझें कर्तव्य आहे व त्यांच्या हितासाटी झटतांना मला थोडे जास्त श्रम पडले तरी ते करणें हें माझें कर्तव्य आहे. ”

मिलच्या मोठ्या इमारतीचें काम सुरू होण्याच्या अगोदर मिलच्या विहिरीचें काम सुरू झालें. या विहिरीच्या कांठाजवळ बाबासाहेब तासचे तास उन्हांत बसत. कारण तें काम फार जोखमीचें होतें. इमारतीचें काम फार दगदगीचें व निकिरीचें असल्याने बाबासाहेब मील आवारांतच एका झोंपडीवजा बंगल्यांत राहत होते. मिलच्या इमारतीला एकूण जो खर्च लागला त्याच्या निदान दीड अगर पावणे दोन पट तरी खर्च सदरहू काम मक्त्याने दिलें असतें तर लागला असतां असें तज्ञ लोकांचें मत आहे.

मिलसाठीं लागणारी मशीनरी कोणती घ्यावयाची या बाबतींत ठिकठिकाणच्या मिल्स पाहून व तज्ञांच्या भेटी घेऊन त्यांनी मशीनरी खरेदी केली. मिलमधील टरबाईन मशीन घेण्याबद्दल तज्ञांत देखील

एकमत नव्हतें. परंतु भविष्यकाळ हा विजेचा होय व आपली मिल टरबाईनशिवाय पुढे जुनी गणली जाईल म्हणून कांही लोक विरुद्ध असतांनासुद्धा त्यांनी टरबाईन आणलें. याकामीं रा. विठ्ठल त्रिंबक उर्फ दादासाहेब पाठक–मिलचे माजी मॅनेजर–यांचा बराच उपयोग झाला. हे टरबाईन मशीनला अनुकूल नव्हते. पण मुंबईचे इलेट्रिक एंजिनीअर रा. एस्. बी. देशपांडे यांच्यावरोबर दोघांनी वादविवाद करून टरबाईन घेण्याचें अखेर ठरविलें.

वऱ्हाडांतली-वऱ्हाडी भांडवलावरची मिल उत्तम चालावी म्हणून मॅनेजरची निवड करण्यांत फार चौकशी करून रा. पाठक यांची निवड केली. ठरलेल्या अंदाजाप्रमाणें भांडवल आलें नसल्याने व आलेल्य रकमा पुरेशा नसल्याने इमारत व मशिनरी यासाठीं अडचण भासूं लागली. सर्वच काम एकदम होणें शक्य नसून कांही वेळ वाट पाहणें जरूर होतें. तरीपण वसूलरकम निरुपयोगी पडूं न देतां व्याजीं लावून त्यापासून थोडेंबहूत त्यांनी उत्पन्न काढलें.

इमारत, मशिनरी व इतर मिलचे व्यवहार याचा त्यांनी एखाद्या विद्यार्थ्यासारखा अभ्यास केला व या बाबतींत ते इतके निष्णात झाले कीं तज्ञाला देखील त्यांच्याशीं अधिकारवाणीने बोलणें जड जात असे. मिलच्या कामाकरितां ते वारंवार मुंबईला जात; तेव्हा प्रत्येक वेळीं तेथील तज्ञांच्या गांठी घेऊन आपली मिल up to date कशी राहील याची ते काळजी ठेवीत.

बाबासाहेबांच्या अविश्रांत श्रमाने मिलचें काम अंदाजें आधींच पूर्ण झालें. प्रथमतः ही मिल फक्त सूत काढण्यापुरतीच तयार झाली.

ता० २६ ऑगस्ट १९२६ रोजीं स्पिनिंग सुरू करण्याचा समारंभ अमळनेरचे श्री. प्रतापशेटजी यांचे हस्तें झाला. यावेळीं इतर लोकां-प्रमाणें बाबासाहेबांनाहि आनंद झाला. या आनदांतच गुंग न राहतां ते नेहमी आपल्या कर्तव्याला जागृत राहिले.

सूतखातें सुरू झाल्यानंतर दोन वर्षांनी त्यांनी कापड खात्याला सुरुवात केली. प्रत्येक मागाला त्यांनी इलेक्ट्रिक मोटर लावण्याचे ठरविलें. त्यावेळीं या बाबतींत बराच खल झाला; व मिलमधील अधि-काऱ्यांची या गोष्टीला संमती नसतांना-देखील त्यांनी प्रत्येक मागाला मोटर लावून मिल अपटूडेट बनविली. कापड खात्याचा उद्घाटन समारंभ ता. २९ जुलै १९२९ रोजीं सर मांटेग्यू बटलर माजी गव्हर्नर मध्यप्रांत व वऱ्हाड यांचे हस्तें झाला. हा समारंभ फारच थाटाचा झाला. त्यावेळीं मिलचे कामाबाबतींत रा. पाठक मॅनेजर व रा. बाबासाहेब देशपांडे अमडापूरकर यांना गव्हर्नर साहेबांच्या हस्ते सुवर्णपदकें देण्यांत आलीं.

बाबासाहेबांच्या काटकसरीने व व्यवहार्य चातुर्याने मिलचे काम सुरळीत चाललें. मिलच्या सुताचा व कापडाचा मुंबई, कलकत्ता, कानपूर, दिल्ली, नागपूर, बैतुल, जबलपूर, अमरावती, आकोला वगैरे ठिकाणीं एजंट नेमून त्यांनी प्रसार केला. ते एजंट नेमूनच स्वस्थ बसले नाहीत; तर त्यांनी वऱ्हाडांतल्या वऱ्हाडांतच १५–२० ठिकाणीं मिलचीं दुकानें उघडलीं. अशा तऱ्हेने मिलच्या मालाचा प्रचार सुरू झाला.

आपण गोरगरीबांच्या रकमा आणल्या; त्यांचे व्याजसुद्धां अजून आपणाला देतां आलें नाही. याबद्दल बाबासाहेबांच्या मनाला नेहमी खंत वाटंत होती. मिलला व्याज देतां न येण्याचें मुख्य कारण मिलला खर्चासाठीं रकम राहिली नाही. कारण मिळालेलें सर्व भांडवल इमारती व मशिनरी यांत अडकलें गेलें; तेव्हा नेहमीच्या खर्चासाठीं लोकांजवळून डिपॉझिट रकमा घ्याव्या लागल्या. तसेंच बँकांकडून कांही रकमा घ्याव्या लागत. यांचें व्याजच इतकें होई कीं आलेल्या नफ्यांतून हें व्याज गेल्यावर शेअर होल्डरांना वाटण्याकरितां फारच थोडी रकम शिल्लक राही. तरीपण शेअर होल्डरांचे अंशतः तरी उतराई व्हावें म्हणून १९३० सालीं प्रत्येक शेअरहोल्डरला १६ पर्सेंट नफा बाबासाहेबांनी वाटला.

यानतर मात्र व्यापारी मंदीमुळे त्यांना नफा वाटतां आला नाही. बाबासाहेब रोज मिलमध्ये येत असत व प्रत्येक खात्याचें काम बरोबर चालतें किंवा नाहीं हें ते स्वतः पहात असत. मिलचें कामकाज आतां सुरळीत चाललें आहे. आपल्या देखरेखी खाली आपल्या मुलांनी या कामाकाजांत निष्णात व्हावें म्हणून १९३० सालींच त्यांनी मिलच्या एक्स ऑफिशिओ डायरेक्टराचे जागेचा राजिनामा देउन आपले चिरंजीव श्री. नारायणराव उर्फ नानासाहेब देशमूख, बी. ए. एलूएल्. बी. यांना मुद्दाम वकीली बंद करण्यास लावून त्यांची एक्स ऑफिशिओ डायरेक्टर म्हणून नेमणूक करून घेतली. नेमणूक झाल्या-नंतर श्री. नानासाहेब हे मिलमध्ये नियमितपणें काम करण्याला येऊं लागले. श्री. नानासाहेबांची निवडणूक त्यांनी मुद्दाम करण्याचें कारण

रा. नानासाहेब हे वकील असून त्यांना मशीनरीची चांगली माहिती व ते स्वत: हाताने काम करतात. बाबासाहेब मधून मधून येत व त्यांना आपल्या अनुभवाचा फायदा देत असत. जरी त्यांनी श्री. नानासाहेबांना सर्व अधिकार दिले होते तरी गोरगरीबांच्या पैशाला शक्य तितक्या लौकर व्याज देतां यावें म्हणून मिलच्या प्रत्येक व्यवहाराची ते चौकशी करीत व प्रसंगोपात योग्य सूचना देत असत. बाबासाहेब व्यवहारदक्ष असल्याने १९३१ सालीं जेव्हा कापडाला जास्त मागणी आली तेव्हा त्यांनी रात्रपाळी मिल चालविण्याची सल्ला दिली व त्याप्रमाणें रात्रपाळी चालू झाली. मिलचे काम ते इतक्या आपुलकीच्या भावनेनें करीत कीं ते मिलचे कामाला सदा वाहिलेले असत. ब्यालन्सशीटच्यावेळीं तर ते मिलमध्यें रात्रीं ११॥ वाजेपर्यंत देखील बसत असत.

पैसा कोणाला नको असें मुळींच नाहीं. पैसा सर्वांनाच प्रिय आहे. त्यांत ज्याची दृष्टी व्यापारी त्याला तर पैसा अत्यंत प्रिय आहे. तेव्हा ज्यांनी शेती, सावकारी, कापडाचें दुकान, जीन व इतर धंदे यांवर चांगलें व्याज सुटत होतें तें मिलमध्यें पैसे अडकविणार नाहीत असें असतांना तुम्ही मिलमध्ये इतकी रकम कशी गुंतविली ? कारण आज बरेच वर्षांत तुमच्या रकमेला व्याज नाहीं. तसेंच इतर मिलच्या म्यानेजिंग एजन्सीच्या अटी व तुमच्या अटी पाहतां मिलच्या नफ्यावरच तुमचें कमिशन. तेव्हां अशा रीतीने मिलची एजन्सी तुम्ही कशी घेतली असें लेखकानें एक दिवस सायंकाळीं मिल सुटली असतांना बाबासाहेबांना विचारलें. त्यावेळीं बाबासाहेब सेक्रेटरींच्या बंगल्यासमोर अंगणांत जमिनीवर बसले होते. बाबासाहेबांनीं उत्तर दिलें:—“ इतकी

साधी गोष्ट मला समजत नाहीं किंवा समजत नव्हती असें नाहीं. पण नफ्यावरच म्यानेजिंग एजन्टचे कमिशन ही अट मी मुद्दाम घातली. कारण मिलला नफा झाला नाहीं तर आपली मेहनत फुकट गेली. पण नफाही नाही व वर म्यानेजिंग एजन्टचा बोजा ही स्थिती बरी नाहीं. मिलच्या म्यानेजिंग एजन्सीवर माझा चरितार्थ अवलंबून नसल्यानें ही अट घालण्यांत मला कांही विशेष वाटलें नाहीं. मिलला नफा नसल्यानें माझें भांडवल बिनव्याजीं राहिलें यापेक्षां मी मिल काढली नसती तर बरें असें मला मुळींच वाटत नाहीं. कारण मिलमध्ये रकम गुंतवितांना मिलपासून कांही वर्षें आपणाला मुळींच व्याज मिळणार नाहीं याची मला जाणीव होती. पण मिलमध्यें रकम गुंतविण्याचे एकच कारण कीं मिलमुळें स्वदेशीला उत्तेजन मिळून हजार दीड हजार माणसांना काम मिळेल व हें काम देण्यांत आपण निमित्तमात्र होऊं."

संध्याकाळीं मिलमधून लोक घरीं जात असतांना प्रसंगोपात ते मिलच्या कामगाराबरोबर बोलत व त्यांना कांहीं अडचणी असल्यास त्या त्यांनीं कळवाव्या म्हणून सांगत.

लहानापासून थोरापर्यंत सर्वांना बाबासाहेब भेटत. बाबासाहेबांची भेट वाटेल तेव्हां वाटेल तेथें वाटेल त्याला घेतां येत होती. ते कामांत असले तरी आलेल्या माणसाची भेट घेऊन त्याचे म्हणणें ते ऐकून घेत. यामुळें चुकुनसुद्धां मिलच्या कामगारावर अन्याय झाला तर त्याची दाद ताबडतोब लागे.

सारांश एखाद्या तत्त्वाप्रमाणेंच त्यांनीं मिलचें काम चालविलें होतें स्वतःवर कामाचा जास्त बोजा पडूं नये म्हणून मिलच्या हिशेबाची

अत्यंत जबाबदारीची बाजू त्यांनी आपले वडील चिरंजीव श्री. पांडुरंग व्यंकटेश उर्फ रावसाहेब देशमुख यांचेकडे बरेच दिवसापासून सोपविली होती व श्री. नानासाहेबांच्या कारकिर्दीतही त्यांनीं तीच प्रथा चालू ठेवली आहे. श्री. बाबासाहेबांच्या गैरहजेरींत तसेच श्री. नानासाहेबांच्या गैरहजेरींत मिलचे सर्व कामकाज श्री. रावसाहेब हे करतात.

## ९

# धार्मिक, सामाजिक व राजकीय मतें

साधारणतः बाबासाहेब हे पुराण मताभिमानि व धार्मिक आचार व्यवस्थित व नियमित पाळणारे होते.

स्नान, संध्या, पूजा, जप, पोथीवाचन हा त्यांचा नित्य क्रम असे. त्यांना त्रिसुपर्ण, पवमानसुद्धां सर्व ब्रह्मकर्म मुखोद्गत होतें.

श्रीमत् भागवत्, श्रीमत् अध्यात्मरामायण, श्रीमत् भगवत् गीता, श्रीमत् भारत, पंचदशी, योगवासिष्ठ, एकनाथी भागवत, व ज्ञानेश्वरी हे सर्व ग्रंथ त्यांनी बरेच वेळां वाचले होते. इतकेंच नाहीं पण या सर्व ग्रंथांचें तुलनात्मक पद्धतीनें अध्ययनहि केलें होतें.

वेदान्त विषयावरील, इंग्रजी, मराठी व संस्कृतांतील बरेच ग्रंथ त्यांनीं वाचले होतें त्यामुळें वेदान्त विषयांत त्यांचीं बरीच प्रगति झाली होती.

स्मृति ग्रंथांचाही त्यांनीं अभ्यास केला होता. बाबासाहेबांचें कुलदैवत श्री पांडुरंग आहे. पूर्वापार चालत आलेल्या प्रतिवार्षिक आषाढीच्या उत्सवाला, त्यांनीं कायमचें, व पद्धतशीर स्वरूप आणून ते हा उत्सव मोठ्या प्रमाणांत अत्यंत श्रद्धेनें व भक्तिपूर्वक करीत असत.

त्यांच्या अंगीं आळस नसल्यानें, कितीही कामें असलीं तरी, त्यांची नैमित्तिक कर्में नित्य चालूच असत.

लहानपणापासून त्यांनीं एकादशीचें व्रत करण्याला सुरवात केली होती. त्यांनीं एकादशीचें व्रत ५० वर्षांपेक्षां जास्त वर्षें सतत केलें. ते कोठेंहीं असलें तरी, साधन द्वादशीला ते नियमित पारणें सोडीत असत.

श्रीमत् भागवताचा स्वाहाकार त्यांनीं निधनापूर्वी केला होता. या शिवाय बरीच धार्मिक व्रतवैकल्यें, ते करीत व सर्व व्रतांची त्यांनीं यथासांग उद्यापनें केलीं होतीं.

बाबासाहेबांच्या मातुश्रीबाई यांचा तसेंच बाबासाहेबांचा, तीर्थ यात्रेकडे विशेष ओढा होता. बाबासाहेबांनीं आपल्या मातुश्रीला, व कुटुंबांतील मंडळींना, बरोबर घेऊन जगन्नाथ, द्वारका, काशी, प्रयाग, गया, हरिद्वार, मथुरा, वृंदावन, गोकुळ, पंढरपूर आदि बऱ्याच तीर्थयात्रा केल्या होत्या.

बाबासाहेब यांनीं श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती-टेंभे महाराज यांचा गुरुमंत्र घेतला होता. एकंदरीत बाबासाहेब म्हणजे श्रद्धा मूल

**ज्ञानयुक्त** निरासक्तीनें कर्म करणारी, प्रवृत्ति मार्गातील, एक विशिष्ट विभूति, अशी सर्वसाधारण समजूत होती, व ती यथार्थहि होती.

बाबासाहेबांच्या अंगच्या सद्‌गुणांची निराळी माहिती दुसरीकडे दिली आहे. त्यांच्या ठिकाणीं एक विशिष्ट व लोकोत्तर गुण म्हणजे त्यांची अप्रतिम ' मातृभक्ति ' हा होय.

प्रात:काळीं उठल्याबरोबर, ते देवांना व मातुश्रीला वंदन करीत, तसेंच बाहेर जातेवेळीं देखील, ते देवांना वंदन करून, आईची परवानगी घेऊन, व आईला वंदन करून नंतर ते बाहेर पडत असत.

आईला सुखांत ठेवण्यासाठीं ते अत्यंत दक्षता ठेवीत. मातृ शब्द म्हणजे ' ब्रह्म वाक्य ' होय असें ते मानीत. आपल्या सर्व आयुष्यांत त्यांनी मातेची कधीहि अवहेलना केली नाहीं किंवा एका शब्दाने देखील मातेला दुखविलें नाही.

मातुश्रीच्या आजारांत, निकडीच्या कामासाठीं, बाहेरगावीं जाण्याचे प्रसंग येत, तेव्हां स्वत:ला वाटेल तितका त्रास सहन करावा लागला तरीं तो सहन करून, ते त्याच रात्रीं मातृदर्शनासाठीं परत येत व पुन्हां जात.

ज्यांना बाबासाहेबांची मातृभक्ति पाहण्याचें पुण्य लाभलें असेल त्यांनाच बाबासाहेबांच्या मातृभक्तिची यथार्थ कल्पना येईल. बाबासाहेबांच्या ठिकाणीं वसत असलेल्या मातृभक्तीचें यथायोग्य शब्दांत वर्णन करण्याचें सामर्थ्य आमच्या लेखणींत नाही.

१०

# विद्याव्यासंग

बाबासाहेबांनी धार्मिक ग्रंथांचा अभ्यास केला होता हें यापूर्वीच सांगितलें आहे. याशिवाय त्यांना बऱ्याच कला अवगत होत्या.

त्यांना ड्रॉइंगची चांगली माहिती होती. ते सर्व तऱ्हेचे नकाशे स्वतः काढीत.

फोटोग्राफींत तर ते तज्ञ फोटोग्राफर इतकें काम करीत.

लहानपणांतच त्यांनी पर्शियन भाषेचा अभ्यास केला होता.

खगोल शास्त्रांचा त्यांनी अभ्यास करून त्यांत त्यांची बरीच प्रगति झाली होती.

ज्योतिषशास्त्राचें त्यांनी उत्तम अध्ययन केलें असून ते स्वतः पत्रिका तयार करीत. स्पष्टग्रह व गणित यांमध्येहि त्यांची प्रगति होती.

ते स्वतः श्रीमंगलमूर्ति गणपतीची पार्थिव मूर्ति तयार करीत. त्याचप्रमाणें स्वतः तयार केलेलें यज्ञोपवीत धारण करण्याबद्दल त्यांचा विशेष कटाक्ष होता. इंग्रजीचे त्यांचे ज्ञान चांगलें असून क्लिष्ट वाक्यांत कशातऱ्हेने इंग्रजींत लिहावें व अमुक ठिकाणीं कोणता इंग्रजी शब्द पाहिजे, हें ते अचूक सांगत.

त्यांनी कोणत्याही इंजिनियरिंग कॉलेजची परीक्षा दिली नव्हती. पण ते उत्तम सिव्हिल व मेकॅनिकल इंजिनियर होते. याबाबतींत तें कोणत्याही तज्ञाची बरोबरी करूं शकत होते.

जिनिंग फ्याक्टरी, व प्रेसिंग फॅक्टरी बरेंच वर्षे स्वतः चालविल्याने व ते स्वतः कापूस खरेदीही करीत असल्यानें, ते कॉटन सिलेक्शनमध्यें तज्ञ होते. पुष्कळ दलाल त्यांना कॉटन एक्सपर्ट म्हणून त्यांची सल्ला घेत.

जगांतील प्रचलित घडामोडींची आपणाला साग्र माहिती असावी म्हणून ते नियमाने दररोज इंग्रजी, मराठी, वर्तमानपत्रें वाचीत असत.

पाश्चात्य व पौर्वात्य विद्वानांच्या प्रसिद्ध ग्रंथांचा, त्यांनी आपल्या ग्रंथसंग्रहालयांत संग्रह केला होता. त्यांची पुस्तकाची निवड नमुनेदार असून त्यांचा ग्रंथसंग्रह बराच मोठा आहे.

बाबासाहेबांची राजकीय मतें साधारणतः प्रतिसहकार पक्षाची होती पण सर्वसाधारण रीत्या राजकीय पुढारी म्हणून ते स्वतःला अलिप्त ठेवीत. बाबासाहेब यांची राजकीय मतें प्रतिसहकार पक्षाची असूनसुद्धां त्यांना प्रतिपक्षाच्या माणसाबद्दल तितकाच आदर असे. स्वराज्य संपादनाला स्वदेशी उद्योग धंद्याची वाढ अवश्य असली तरी इतर सर्व चळवळीचा स्वराज्य साधनाला उपयोग आहे असें ते मानीत.

आपण काढलेल्या गिरणीला आपल्याला हवीं तीं माणसें मिळालीं म्हणजे आपला धंदा चांगला चालून स्वदेशीला जास्त

उत्तेजन मिळेल या दृष्टीनें व लेखक हा आपलाच एक आहे या समजुतीने त्यांनी लेखकाची मिलमध्यें १९३० सालीं सेक्रेटरीच्या जागेवर नेमणूक केली.

सन १९३० हें साल हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीचे बाबतींत सुवर्णाक्षरांनीं लिहिलें जाणारें, स्वातंत्र्याच्या वातावरणाचें साल होतें. लेखक मिलमध्यें कामावर रुजूं झाल्यानंतर राजकीय चळवळींत भाग घेऊं लागला. त्याचा परिणाम त्याच्यावर "वारंट ऑफ ॲरेस्ट येण्यांत झाला. सत्याग्रहाचा तो, काल होता. चार दोन दिवसांत लेखकाला श्रीकृष्णनिवासांत जावें लागणार आहे ही कल्पना बाबासाहेबांना दुःखद वाटली. एके दिवशीं सकाळीं ते ऑफिसांत आले व "मला धोंडोपंताशीं कांहीं बोलायचें आहे, तुम्ही जा" असें त्यांनीं सर्व कारकुनांना सांगितलें व त्यांनीं या बाबतींत लेखकाशीं आपुलकीच्या भावनेनें बोलण्याला सुरवात केली.

"धोंडोपंत! हिंदुस्थानच्या उत्कर्षाला स्वदेशी हें मुख्य साधन आहे व त्यासाठीं ही मिल काढण्यांत आली. तुम्हीच यावेळीं राजकारणांत उतरून सत्याग्रह करून स्वदेशीच्या उत्कर्षाकरितां चालविलेल्या गाड्याला खीळ घालतां. तुम्ही सत्याग्रह करता हा युक्त आहे हें मला पटल्याशिवाय मी तुम्हाला सत्याग्रहांत भाग घेऊं देणार नाहीं."

लेखकाची व बाबासाहेबांची या विषयावर बरीच चर्चा होऊन शेवटीं सत्याग्रहांत लेखकाने भाग घेणें ही गोष्ट अत्यंत इष्ट आहे हें

पटवून देण्याचें भाग्य लेखकाला मिळालें. असें होतें तरी आपुलकीच्या भावनेने लेखकाच्या भावी कारागृहवासाचें चित्र त्यांच्या चर्मचक्षूपुढें उभें राहिल्यानंतर त्यांच्या हृदयाला पीळ पडला. याचवेळीं कै. बाबासाहेब पांगरकर तेथे आले. त्यांनी पांगरकरांना सांगितलें, " धोंडोपंत करताहेत त्या कृत्याला माझी पूर्ण सहानुभूति असली तरी त्यांचे विषयीं माझ्या मनांत असलेल्या प्रेमामुळें त्यांनीं कारागृहांत जाऊं नये— सत्याग्रह करूं नये असें मला वाटतें. तरी तुम्ही त्यांची समजूत घाला." बाबासाहेब देशमुख व बाबासाहेब पांगरकर अशासारख्या दोन वडिलांसमान असलेल्या परमपूज्य विभूतींच्या इच्छेविरुद्ध त्यांचा आशिर्वाद न मिळतां आपल्या हेकेखोरपणाने सत्याग्रह करणें माझ्यासारख्या वडिलांचा शद्ब म्हणजे ब्रह्मवाक्य मानणाऱ्या इसमाला शक्य नव्हतें. पण परमेश्वर कृपेने थोड्याशा वादविवादानंतर दोघाहि वडील माणसांनीं ज्या प्रेमाने ते मजकडे पहात असत त्याच प्रेमळ भावनेने त्यांनीं सत्याग्रह करण्याला अनुमति दिली. इतकेंच नाही तर दोघेहि आपल्या पुत्र व मंडळीसह लेखकाला शुभ आशिर्वाद देण्याकरितां बहिरम मुक्कामीं सत्याग्रहाच्या ठिकाणीं हजर होते. बहिरमला त्यांचा शुभ आशिर्वाद घेतल्यानंतर १ ऑगष्ट १९३० इसवी दिवसा ११ च्या सुमारास लेखकाने जंगल सत्याग्रह केला.

स्वदेशी उद्योगधंदे वाढल्याने देशाचा उत्कर्ष होईल, असें त्यांचें ठाम मत होतें, व त्या दिशेनें त्यांचें प्रयत्न चालू असत.

लोकनायक बापुजी अणे, लोकमान्य टिळक, महात्मा गांधीजी, पंडीत मालवियजी, पंडीत मोतीलालजी या सर्व वंद्य विभूती विषयीं

त्यांच्या मनांत अत्यंत आदर वसत होता. सामाजिक बाबतींत देखील परिस्थित्यनुरूप त्यांचे विचार बदलले होते.

स्त्रीशिक्षणाचे बाबतींत प्रचलित पद्धती त्यांना पसंत नव्हती. पण प्रत्येक मुलीला विशिष्ठ मर्यादेपर्यंत शिक्षण व त्याबरोबरच गृह-शिक्षण दिलें पाहिजे असें त्यांचें मत होतें.

अस्पृश्याविषयीं त्यांच्यावर अन्याय होत आहे हें त्यांना कबूल होतें. सध्यांच्या रुढींत कांहीतरी फरक झाला पाहिजे असें त्यांना वाटत होतें. पण हा फरक घडवून आणण्यासाठीं अनधिकारी गृहस्थांच्या खटपटी-विषयीं त्यांना विशेषसा आदर नव्हता. श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्यासारखा पुरुष निर्माण झाल्याशिवाय या प्रश्नाचा समाधान-कारक निकाल लवकर लागणार नाही असें त्यांना वाटत होते. महात्मा गांधीची तपश्चर्या पाहून कधीं कधीं त्यांना असेंही वाटे कीं अस्पृश्यो-द्धाराच्या कार्यासाठींच त्यांचा अवतार असावा. एकंदरीत स्पृश्य अस्पृश्य हा भेद नाहींसा झाल्यास त्यांत हिंदूधर्माचें स्वरूप अधिक उज्वल होईल असें त्यांना वाटत होतें. पण अस्पृश्योद्धाराच्या बाबतींत हिंदू संघटनवाले आक्रमित आहेत तो मार्ग त्यांना पसंत नव्हता. त्यांचें असें मत होतें कीं सध्यांची अस्पृश्योद्धाराची चळवळ हिंदूधर्मावरील अस्पृश्योद्धाराचा कलंक धुतला जावा याच एका कार्यासाठीं नसून तिला राजकारणाचेही विशिष्ट स्वरूप आहे.

आपल्या मुलांना बाबासाहेबांनीं शिक्षण दिलें त्याबरोबरच नातेवाईकांनाही त्यांनीं शिक्षण दिलें. पारडीकर देशपांडे भाऊसाहेब,

दादासाहेब, त्याचप्रमाणें अमडापूरकर देशपांडे बाळाभाऊ, शामराव व राजाभाऊ यांचें बरेंच शिक्षण बाबासाहेबांच्या घरीं झालें.

बाबासाहेबांनीं पुष्कळ पैसा मिळवून आपली इस्टेट वाढविली. पण इतकें करूनही ते स्वस्थ बसले नाहीत. त्यांच्या मनांत दीन-दुबळ्यासाठीं कांहीतरी करावें असें होतें. आपल्या आईच्या नांवानें श्री. राधाबाई आयुर्वेद औषधालय त्यांनी स्थापन केलें. या दवाखान्याचा कायम खर्च चालावा म्हणून त्यांनी चाळीस हजार रुपये दिले. व त्याचें ट्रस्ट डीड त्यांनी केलें आहे.

तसेंच आपल्या मृत पुत्राच्या रा. माधवराव ऊर्फ भय्याजी यांच्या स्मरणार्थ त्यांनी ३२ एकरांचें एक शेत गायींना चरण्यासाठी येथील गोरक्षण संस्थेला दिलें. (हायस्कूल लायब्ररी वगैरे संस्थांना त्यांनी वेळोवेळीं बरेंच द्रव्य–सहाय्य केलें आहे.

## ११

# यशाची गुरुकिल्ली

वऱ्हाडांतील एकंदर जमेदार घराण्याकडे पाहतां असें दिसून येईल कीं जमेदार मंडळी आपली स्थिति सुधारण्याऐवजीं आपण जमेदार या भावनेला बळी पडले. त्या तोऱ्यांत त्यांनी आवांक्याबाहेर खर्च करून स्वतःची स्थिति वाईट करून घेतली. याला जे थोडे जमेदार अपवाद आहेत त्यांत बाबासाहेब अग्रस्थानीं आहेत. बाबासाहेबांनी

आपली स्थिती इतकी सुधारली कीं त्यांनी इस्टेटीचा कारभार करण्यास सुरवात केली त्यावेळीं त्यांचें जें ५-६ हजारांचें वार्षिक उत्पन्न होतें तें आपल्या निधनकाळीं जवळ जवळ ५०–६० हजारांवर त्यांनीं आणलें. म्हणजे त्यांनी आपल्या उत्पन्नाची जवळजवळ दसपटीने वाढ केली. आपल्या मुलांबाळांसाठीं त्यांचा प्रपंच सुखाने चालावा म्हणून प्रत्येक जीव धडपडत असतो. आपल्या आयुष्यांत आपल्या मुलांसाठीं आपण कांही ठेवलें आहे व त्यांना परिस्थितीप्रमाणें राहण्याला अडचण पडूं नये अशी प्रत्येक जनकाची इच्छा असते. अशा तऱ्हेने मुलांची तरतूद चालविली गेली आहे हें पाहून प्रत्येक पित्याला आपण आपलें कर्तव्य केलें असें वाटून सात्विक आनंद होतो.

बाबासाहेबांना निधनापूर्वीं श्रीपांडुरंगाच्या कृपेनें हा सात्विक आनंद पूर्ण लाभला होता. ते कधीं कधीं असेंही म्हणत कीं मला एकट्याला जें उत्पन्न मिळालें तेवढेंच नाहीं पण त्याच्या दीडपटीने ज्यास्त मी प्रत्येक मुलासाठीं ठेवलें आहे. तेव्हा मुलाबाळांच्या ऋणांतून श्रीपांडुरंगाने मला मुक्त करून मुलांकरतां मी कांही केलें नाही अशी कुरकुर करण्यास त्यांना जागा नाही.

ही परिस्थिती प्राप्त होण्यास त्याच्या अंगचे सद्गुण व त्यांचा दीर्घोद्योग हे तर कारणीभूत आहेतच; पण याशिवाय त्याबरोबरच यशाची गुरुकिल्ली म्हणजे काटकसर ही गोष्ट सर्वांत मुख्य आहे. काटकसर म्हणजे कंजूषपणा नव्हे. काटकसर म्हणजे ज्या कामाला

साधारण दहा रुपये लागतात तें काम नऊ रुपयांत कसें होईल अशी युक्ती शोधून काढून त्याप्रमाणें तें नऊ रुपयांत करून घेणें. आवश्यक कार्यें व लग्नप्रसंग हीं त्यांच्या काटकसरीला अपवाद होतीं. लग्नप्रसंगांत वऱ्हाडांतील वतनदार मंडळी खूप पैसा खर्च करतात व आपली स्थिती बिघडवून घेतात. हा आरोप सर्वथैव खोटा नसला तरी त्यांत बरेंच तथ्य आहे. बाबासाहेब म्हणजे मूर्तीमंत काटकसर अशी जरी त्यांची ख्याती होती तरी लग्नकार्यांत तें वतनदारासारखाच खर्च करीत. बाबासाहेब उदार नव्हते पण ते न्यायी होते. म्हणजे पात्रापात्रतेचा ते विचार करून दानधर्म करीत. तसेंच ते कोणालाही मदत व आश्रय देत. त्यांचा धर्मादाय व्यक्तिगत नसून सार्वजनिक स्वरूपाचा होता. उलटासुलटा हिशेब करून कोणाचाही जास्त पैसा ते घेत नसत. हिशेबांत ते अत्यंत चोख असत. पण आपली निघत असलेली हिशेबी पै-देखील ते कोणाला सोडीत नसत. केवळ लौकिकाला बळी पडून अनाठाई एक पै देखील त्यांनी खर्च केली नाही. त्यांना कोणतेंही व्यसन नव्हतें, व त्यांची नीतिमत्ता आदर्शभूत होती. त्यांनी प्रत्यक्ष स्वतःच्या हातानें उचलून देऊन कोणाला श्रीमंत केलें नाही; पण त्यांच्या नित्य सहवासामुळे व प्रेमामुळे व तसेंच अपरोक्ष आश्रयाने रा. रा० भाऊशास्त्री वकील, रा. रा. रामभाऊ आष्टीकर देशपांडे व उपाध्ये वे. मू. बाबाभटजी यांची स्थिती बरीच सुधारली.

आपल्या अंतःकरणांत दया आहे हें नोकरांस कळलें तर त्याचा ते गैर-फायदा घेतील व त्यामुळे काम व्यवस्थित न झाल्याने खाजगी अथवा मील जीन प्रेस या संस्थांना नुकसान लागेल म्हणून

ते व्यवहारांत अत्यंत निर्भीड व कडक होते. व्यवहारांत दया हा शद्ब त्यांना माहीत नव्हता. पण त्याबरोबर ते निष्ठूरही नव्हते. ज्यांना मदतीची अत्यंत जरूरी आहे अशांना ते प्रसंगोपात न कळत मदत करीत.

प्रत्येक बाबतींत वादविवाद करण्याची त्यांना हौस होती. वादविवाद करूनच ते पुष्कळ बाबतींत दुसऱ्याची सल्ला घेत व शेवटीं काय करावयाचें तें स्वतः ठरवीत. ते बरेचसे निर्भीड असून स्वतंत्र बाण्याचे असल्यामुळे प्रसंगोपात त्यांचे पुष्कळांशीं बरेच खटके उडत. या त्यांच्या स्वभावाला सरकारी अधिकारी अपवाद नव्हते. बाबासाहेबांना अन्याय झालेला मुळींच सहन होत नसे. व आपणावर कोणी विनाकारण अन्याय केला अशी त्यांची खात्री झाली तर ते, त्याची योग्य ती दाद लागेपावेतों, स्वस्थ रहात नसत. बाबासाहेब यांच्या तरुणपणांतील काळ सध्यासारखा नव्हता. त्यावेळचे तहसिलदार, सब डिव्हिजनल ऑफिसर्स वगैरे अधिकाऱ्यांविरुद्ध कुणाचीही ब्र काढण्याची ताकद नव्हती व म्हणूनच त्यांनी केलेला जूल्म किंवा अपमान निमूटपणें सहन करण्याचा त्या काळांत बऱ्याच जणावर प्रसंग येई. अशाच तऱ्हेचे २–३ प्रसंग चरित्रनायकावर आले. पण अधिकाऱ्याच्या खपा मर्जींची पर्वा न करिता बाबासाहेबांनी त्याप्रसंगीं आपला स्वाभिमान कायम रहावा म्हणून सदरहू अन्यायाची वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार करून दाद लावून घेतली.

बाबासाहेबांचे वडील चिरंजीव रावसाहेब यांच्या व्रतबंधनाचेवेळीं मांडव बांधण्यासाठीं आणलेल्या तट्यांची गाडी घरी येत असतांना व

गाडीवाल्यानें हे तट्टे बाबासाहेबांनी विकत घेतले असें सांगूनसुद्धा त्यावेळच्या तहसिलदाराच्या शिपायाने तहसीलदारसाहेबांच्या सांगण्यावरून ते तट्टे तहसीलदारसाहेब यांच्या घरीं नेले. ही गोष्ट बाबासाहेबांना कळतांच प्रथम त्यांनीं सामोपचाराने तट्टे परत करण्याविषयी निरोप पाठविला. पण त्याचा कांहीच परिणाम झाला नाही. तदनंतर ही बाब एलिचपुरचे डेप्युटी कमिश्नर यांचे कानावर बाबासाहेबांनी घातली; व तहसिलदारसाहेबाकडे गेलेले तट्टे बाबासाहेब यांचेकडे तहसिलदारांनीं झालेल्या गोष्टीबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून परत पाठविले व आपल्या घरच्या मंडपासाठीं त्यांनी निराळी व्यवस्था केली.

म्युनिसिपल कमेटीचे बाबासाहेब व्हाइस चेअरमन असतांना त्यांचा व सबडिव्हिजनल ऑफिसर जे तेव्हा म्युनिसिपल चेअरमन होते यांचा मानापमानावरून खटका उडाला. त्याचीही त्यांनी योग्य अधिकाऱ्यामार्फत दाद लावून घेतली. वऱ्हाडचे कमिश्नर मि. स्टँडन-साहेब यांना बाबासाहेबांनी खाजगी पार्टी देण्याचें ठरविलें. पार्टीकरितां म्युनिसिपालिटीची जागा मुकरर करण्यांत आली, गांवांतील इतर संभावित गृहस्थांना तसेंच अधिकारी वर्गांना आमंत्रणें पाठविण्यांत आलीं. त्यावेळीं म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष व येथील सबडिव्हिजनल ऑफिसर फिरतीवर होते. बाबासाहेबांनी सबडिव्हिजनल ऑफिसरलाही या पार्टीला येण्याचें आमंत्रण पाठविलें, व आपण हजर राहिलेंच पाहिजे अशी विनंतीही केली. ठरलेल्या वेळीं व ठिकाणीं सदरहू पार्टीचा समारंभ झाला. त्यावेळीं सबडिव्हिजनल ऑफिसरसाहेब कांही कारणामुळें हजर राहूं शकले नाहीत. आपण या सबडिव्हिजनचे अधिकारी, इलिचपूर म्युनिसि-

पालिटीचे अध्यक्ष, आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या एका अधिकाऱ्याने आपणाला न विचारता, आपली सल्ला न घेतां आपल्या पश्चात कमिश्नर साहेबांना पार्टी द्यावी, हें बाबासाहेबांचें करणें अधिकारपदावर असलेल्या सबडिव्हिजनल ऑफिसरला शल्यासारखें टोंचूं लागलें. व येथे आल्यावर त्यांनी अधिकाऱ्याला न शोभण्यासारखें म्युनिसिपल कमेटीच्या मीटींगमध्यें अपमानास्पद शब्द वापरले. सबडिव्हिजनल ऑफिसरने केलेला अनाठायीं अपमान बाबासाहेबांना सहन झाला नाही. हें प्रकरण शेवटीं 'लोकल गव्हर्नमेंट' पावेतों जाऊन त्या सबडिव्हिजनल ऑफिसरला आपले शब्द परत घ्यावे लागले व झालेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी प्रदर्शित करावी लागली.

बाबासाहेब फार खोल अंतःकरणाचे होते. त्यांच्या नेहमी सहवासांत असणाऱ्यांना, इतकेंच नाही; पण त्यांच्या मित्रांना देखील त्यांच्या अंतःकरणाचा ठाव लागत नसे. हें त्यांचें वैशिष्ट्य होतें. कोणी इसम त्यांच्याशीं बोलूं लागला कीं ते त्याची ताबडतोब परीक्षा करीत. दुसऱ्याची छाप ते आपल्या स्वतःवर केव्हाच पडूं देत नव्हते. उलट दुसऱ्यावर ते आपली छाप ठेवीत.

प्रसंगोपात त्यांची चूक जर कोणी त्यांच्या नजरेस आणली व ती त्यांना पटली तर त्या इसमावर न रागावतां ते आपली चूक कबूल करीत व त्या इसमाला त्यानें दाखवून दिलेल्या चुकीबद्दल शाबासकी देत.

व्यापारी असो, लहान असो, मोठा असो, नोकर असो किंवा प्रत्यक्ष स्वतःचा मुलगा असो यांपैकीं कोणाकडून धंद्यांत किंवा इतर

व्यवहारांत चूक झाली तर ते त्याची बरोबर हजेरी घेत असत. ते विरोधाची पर्वा करीत नसत. उलट त्यांना विरोध झाला कीं, त्यांचा उत्साह वाढत असे.

ते व्यवहार चतुर, सतत उद्योगी, दीर्घ परीश्रमी व अत्यंत दक्ष होते. त्यांना मनुष्याची उत्तम पारख होती. त्यांची पारख कधीहि खोटी ठरली नाहीं. ते स्वाभिमानी होते. मात्र त्यांना खोटा अभिमान किंवा बडेजावी नव्हती. ते निरालस होते. त्यांची राहणी अत्यंत साधी होती. आपण इतकी संपत्ति मिळविली. पैशाच्या जोरावर आपण वाटेल तें करूं शकूं आपल्या हाताखालीं इतके नोंकर आहेत तेव्हा आपल्याला दुसऱ्याची पर्वा कशाला ? अशा तऱ्हेची उद्दाम कल्पना त्यांना कधीच शिवली नाहीं. उलट गरीब नोकराबरोबर देखील ते अत्यंत प्रेमाने बोलत. त्यांना गर्व नव्हता.

सरकारला ते प्रसंगोपात मदत करीत. पण या मदतीचा आपणाला लौकिकदृष्ट्या कांही फायदा व्हावा अशी त्यांनी केव्हांहि अपेक्षा केली नाही. त्यांनी मनांत आणलें असतें तर ते रावसाहेब रावबहादूर अथवा सर-सुद्धां झाले असते.

कारण अशातऱ्हेने जनतेपुढे येण्याला त्यांना साधनांची विपुलता होती. सरकारी अधिकारी तसेच गांवांतील लोक या दोघाबरोबरहि ते अत्यंत प्रेमाने व मिळून मिसळून वागत असत. या त्यांच्या वृत्तीमुळे ते दोघांनाहि सारखेच प्रिय होते.

आपल्या आप्तेष्टांविषयीं व स्नेह्यांविषयीं बाबासाहेबांना फार आपुलकी वाटत असे. व यांपैकीं कोणी भेटल्यास त्यांना आनंद होई. लग्न, मौंज हे प्रसंग सर्वांच्या घरीं मंगल प्रसंग असतात. अशा शुभ प्रसंगीं प्रत्येक-जण आपआपल्या आप्तइष्ट मंडळींना प्रेमाने आमंत्रण देतों. बाबासाहेबांच्या येथे अशा शुभप्रसंगीं आपला कोणताहि आप्त, इष्ट मित्र अथवा परिचित गृहस्थ याला आमंत्रण देण्याचें चुकून सुद्धां राहूं नये यासाठीं बाबासाहेबांनी आपल्या रेकॉर्डांत एक पक्की यादी केली होती व यावरून त्यांचा आप्तइष्टाविषयींचा आपुलकीचा भाव दिसून येतो. तशीच त्यांची टापटीप व दूरदर्शीपणा याचेंही आकलन होतें.

[ बाबासाहेबांच्या जवळच्या नातलगांची यादी परिशिष्ट ४ म्हणून जोडली आहे. ]

## १२

# संतती व लोकसंग्रह

संतती व संपत्ती एकाच ठिकाणीं क्वचित्च नांदते. बाबा-साहेबांच्या जन्मापावेतों देशमूख घराण्याच्या वंशाचा वृक्ष प्रसार पावला नव्हता. पण श्रीपांडुरंगाच्या कृपेनें व बाबासाहेबांच्या धार्मिक व नैतिक तपश्चर्येनें त्यांच्या घराण्याचा वंशवृक्ष फोपावला. त्याला सुंदर फुलें आणि फळें आलीं. अकालीं कांहीं फुलें व फळें पडलीं. बाबासाहेबांच्या हयातींत त्यांचीं वयांत आलेलीं दोन अपत्यें दिवंगत झालीं. त्यांची

कन्या सौ. निराबाई उर्फ नानीबाई आपल्या वयाच्या २५ व्या वर्षी दिवंगत झाल्या. उमरावतीचे प्रसिद्ध नागरिक रावबहादूर डोळे यांचे चिरंजीव नानासाहेब यांच्या बरोबर त्यांचा विवाह झाला होता.

बाबासाहेबांचे चिरंजीव माधवराव ( भय्याजी ) हे आपल्या वयाच्या १९ व्या वर्षी तापाने परलोकवासी झाले. भय्याजीचें शिक्षण इंग्रजी ४ थी पावेतों झालें होतें.

वऱ्हाडांत श्रीमंतांचीं मुलें साधारणतः कमी शिकलेलीं. त्यांतून संपत्ति व इस्टेट असलेल्या वतनदाराची वृत्ति आपल्या मुलाला शिकून काय करायचें अशा तऱ्हेची नेहमी असावयाची. पण देशकाल परि-स्थित्यनुरूप बाबासाहेबांनीं आपल्या सर्व मुलांना सुशिक्षित व व्यवहार--चतुर बनविले. सर्वांत वडील चिरंजीव रा. रा. रावसाहेब यांना मॅट्रीक पावेतों शिकवून धंद्यांत घातलें व स्वतः इतके त्यांनीं त्यांना तरबेज करून ठेवलें. दुसरे चि. रा. रा. नानासाहेब यांना कॉलेजांत पाठवून कॉले-जांतील सर्व कोर्स त्यांचेकडून त्यांनीं पूर्ण करवून घेतला. रा. नानासाहेब एल् एल्. बी. आहेत. यांना इंजिनीअरिंगचा विशेष नाद असल्याने व त्यांत त्यांची बरीचशी प्रगति असल्याने त्यांनी मिलचें सर्व कार्य त्यांचेकडे सोपविलें. तिसरे चि. रा. रा. आबासाहेब यांनाही त्यांनी कॉलेजांत पाठविलें. मिलच्या सुरवातीचा पसारा व निरनिराळ्या धंद्याचा व्याप यामुळे बाबासाहेब व रावसाहेब यांना शेतीकडे पहावयास सवड नसल्याने त्यांनी आबासाहेबांना कॉलेजांतून काढून घेऊन शेतीच्या देखरेखीचें सर्व काम त्यांचेकडे दिलें. बाबासाहेबांची शेती अंदाजी ५,००० एकर असून शेतीची सर्व व्यवस्था आबासाहेब अत्यंत

कुशलतेने करीत आहेत. बाबासाहेब नेहमी म्हणावयाचे " प्रत्येक मुलाला पुरून उरेल इतकें काम मी प्रत्येकासाठीं ठेवलें आहे."

. . . .

मिलचा व्याप मोठा असल्याने व नानासाहेबांना एकट्याने सर्व बाबतींत पाहण्याला सवड होणार नाही व आपलाच आणखी एकादा तरी मुलगा तेथे असावा या हेतूने त्यांनी चवथे चि. रा. रामभाऊ यांना व्हिक्टोरिया टेक्निकल-मध्ये पाठवून टेक्स्टाईलचा कोर्स घेवविला. १९३३ च्या एप्रिलमध्ये त्यांचा कोर्स पूर्ण झाला व ते मिलचें काम पाहूं लागले. तदनंतर ते विलायतेला जाऊन तेथे शिक्षण घेऊन परत आले. ते सध्या मिल मॅनेजरचें काम करीत आहेत. पांचवे चि० रा० दादासाहेब हे येथील एम्. एस्. सीचा अभ्यासक्रम संपवून १९३३ च्या सप्टेंबरमध्ये विलायतेला इलेक्ट्रिक इंजिनीअरिंगचा कोर्स घेण्याला मँचेस्टर येथे गेले होते. तो पुरा करून व इलेक्ट्रिकल टेक्निकल इंजिनीयरिंगच्या डिग्र्या घेऊन ते परत १९३७मध्ये आले व सध्या ते हैद्राबाद स्टेट सर्व्हिसमध्ये पर्सनल असिस्टंट टू धी इलेक्ट्रिकल ॲड-व्हायसर या हुद्यावर आहेत. सहावे चि रा. गोविंदराव हे मुंबई विश्वविद्यालयाचे एम्. एस् सी. होऊन सध्या इलिचपूरला व्यापार करीत आहेत. लक्ष्मीदेवीच्याच आराधनेंत काल न घालता त्याबरोबरच देवी सरस्वतीच्या सेवेचा त्यांनी मार्ग स्वीकारून आपल्या मुलांना सर्व तऱ्हेने सुशिक्षित केलें.

आपल्या मुलांना जसें त्यांनी सुशिक्षित केलें तसेंच आपल्या स्वकीयांच्या शिक्षणाचीहि त्यांनी तजवीज केली हें पूर्वीं नमूद केलेंच

आहे. याशिवाय त्यांचें वैशिष्ट्य म्हणजे त्यांना वऱ्हाडच्या माणसाविषयीं फार आपलेपणा वाटत असे. वऱ्हाडी माणसाविषयीं आपलेपणा जरी त्यांचे ठिकाणीं होता तरी जे वऱ्हाडी नाहीत त्यांच्याविषयीं त्यांच्या मनांत दुजाभाव नव्हता. तसें असतें तर घरीं जिनांत, दुकानावर व मिलमध्ये वऱ्हाड्याशिवाय त्यांनी दुसऱ्या कुणालाच ठेवलें नसतें.त्यांनी संस्थेच्या फायद्याच्या दृष्टीने संकुचित दृष्टि न ठेवतां ब्राह्मण-ब्राह्मणेतर या सर्वांना योग्य प्रमाणांत वाव दिला होता. मिलमध्ये अस्पृश्यांच्या हिताविषयीं त्यांनी बरीच काळजी घेतली होती.

बाबासाहेबांजवळ स्वतःचीं माणसें नव्हतीं असें नाही. पण बाबासाहेबांना उच्चदर्जाचीं लायक माणसें हवीं होतीं. यामुळे त्यांच्या जवळच्या माणसांना वाव मिळाला नाही अशी पुष्कळांची तक्रार आहे. पण ती वस्तुस्थितीला सोडून आहे. कारण बाहेरच्या माणसांना बाबासाहेबांच्या स्वभावाचें ज्ञान नसल्याने व जवळच्या माणसांना त्यांचा स्वभाव ठाऊक असल्याने सहसा बाबासाहेबांकडे येण्याची स्वकीयांची प्रवृत्ति नसे. याचें दुसरेंहि कारण असें होतें कीं बाबासाहेबांना लायक माणसाचें कामहि अपुरें वाटे. बाबासाहेब प्रत्येकापासून त्याच्या आवांक्याबाहेर कामाची अपेक्षा करीत त्यामुळे साहजीकच कुणालाही आपल्या कामाने बाबासाहेबांना संतुष्ट करतां आलें नाही असें जरी होतें तरी प्रत्येकाची खरी किंमत काय आहे याची त्यांना जाणीव असल्याने त्यांनी सहसा कुणाच्या पोटावर पाय दिला नाही. उलट एकाद्या नोकराने त्यांचा स्पष्ट शब्दांत केलेला अपमानदेखील ते गिळून घेत असत. कारण त्यांना माहीत होतें कीं आपण या इसमा-

कडून मर्यादेबाहेर काम घेत आहेत. लायक माणसांचे त्यांचेजवळ चीज होत असे. पण आपल्या गुणाचे बाबासाहेब चीज करतील अशी लायक माणसाला देखील खात्री नसे. कारण कितीही काम केलें तरी बाबासाहेबांना तें अपुरेंच वाटे. याचें दुसरेंही एक कारण होतें, व तें हें कीं, प्रत्येक लायक माणसापासून तें नहमींच उच्च व पुष्कळ कामाची अपेक्षा करीत.

कै० भाऊसाहेबांनीं ( त्यांच्या मामांनीं ) लहानपणीं व तदनंतर ज्या आपुलकीच्या नात्यानें वागविलें त्याच पद्धतीनें त्यांनी कै. भाऊसाहेब अमडापूरकर यांच्या मुलांबरोबर वर्तन ठेवलें आहे. आपल्या मुलांइतकेंच त्यांच्याही मुलांवर त्यांचें प्रेम होतें.

कै० भाऊसाहेब यांचे मामा कै० अच्युतराव देशपांडे बाळापूरकर, कै० भाऊसाहेबांनी पेनशन घेतल्यावर मातुलगृहीं शेवटचे दिवस काढून आपला देह मातुलगृहीं ठेवला. मामांच्या मातुलप्रेमामुळेंच बाबासाहेबांचा व बाळापुरकरांचा संबंध आला. कै० पुरुषोत्तम अच्युतराव उर्फ बापुसाहेब देशपांडे, कै० श्रीनिवास अच्युतराव उर्फ रावसाहेब देशपांडे, तसेंच कै० आबासाहेब व कै० रावसाहेब देशपांडे बाळापूरकर या सर्वांवर त्यांचे फार प्रेम होतें. बाबासाहेब बाळापुरला येत असल्यामुळे त्यांची व लेखकाची थोडीशी ओळख झाली व लेखकाच्या लायकीपेक्षा हा इसम आपला आहे, आपल्यापैकी आहे व होतकरू आहे या भावनेनेच बाबासाहेब लेखकाकडे नेहमीं पहात असल्यामुळेच बाबासाहेबांचा फक्त सहा सात महिनेच लेखकाला मिळच्या कामामुळे सहवास घडला. चरित्रलेखकाच्य

मिलसेक्रेटरीच्या कामाने बाबासाहेबांना कितपत संतोष झाला याविषयीं लेखक अज्ञात आहे. मात्र लेखकाविषयीं त्यांना अभिमान वाटत होता याची लेखकाला माहिती होती. बाळापुरकर देशपांडे घराण्याविषयीं बाबासाहेबांच्या मनांत अत्यंत प्रेम होतें, या त्यांच्या प्रेमामुळेच देशपांडे घराण्यांतील सर्व जणांची त्यांचे ठिकाणीं संपूर्ण भक्ति होती. बोरी अडगांव जहागिरीचा आपसांत वाद बराच माजलेला होता. त्या वादाचा आपसांत निकाल सर्वांच्या संमतीने त्यांनी व बुलडाण्याचे श्रीमंत रा. रा. आण्णासाहेब पिंपरीकर वकील यांनी लवाद म्हणून दिला. या कामांत— देखील बाबासाहेबांनी प्रेमामुळेच अत्यंत परीश्रम घेतले.

जसा बाळापुरकरांविषयीं त्यांना आपलेपणा वाटत होता तितकाच किंबहुना जास्त आपलेपणा बाळापुरच्या गावली महाराजांच्या घराण्याविषयीं त्यांना होता. एकतर गावली महाराजांचें घराणें जुनें व वऱ्हाडांत नांवाजलेलें. शिवाय मामी गावली घराण्यांतल्या. गावली घराण्याविषयीं बाबासाहेबांच्या मनांत अत्यंत आदर असून महाराजांच्या रामदरबारांत आपली सेवा रुजू व्हावी या हेतूनेंच ते गावली घराण्याकडे पहात असत. अंजनासिंगीकर, अमडापूरकर, बाळापूरकर, यांच्याप्रमाणेंच पारडीकर देशपांडे यांच्या घराण्याविषयीं त्यांना फार अभिमान होता. रा. रा. भाऊसाहेब पारडीकर, व. रा. दादासाहेब पारडीकर हे बाबासाहेबांचे साक्षात् मावसभाऊ. आपल्या मुलांच्या ठिकाणीं बाबासाहेबांचे जितकें प्रेम त्यापेक्षां रा. दादासाहेबांवर त्यांचें प्रेम जास्त होतें. ते स्वतःच्या मुलांना नाराज करीत पण दादाला सहसा नाराज करीत नसत. कारण त्यांना ठाऊक होते कीं, आपण दादाला नाराज केलें व दादानें जाऊन

बाईला सांगितले व दादाची चूक असूनसुद्धा त्याच्यावरील प्रेमानें जर बाईने आपल्याला अमुक करा असें सांगितलें तर मातृआज्ञा पालन करणें आपलें कर्तव्य म्हणून तें करावें लागेल. मावशीच्या मुलांच्या ठिकाणीं इतकें प्रेम व आपलेपणा इतरत्र आढळणेंच कठीण.

वरील घराण्यांशिवाय जळगांवचे कै० दीनाबाबा तसेंच सुरजीकर दाजीसाहेब देशपांडे, आकोटकर देशपांडे, अडगांवकर देशपांडे व त्यांतही श्री. रा. रा. दाजीसाहेब अडगांवकर देशपांडे रिटायर्ड एक्स्ट्रा आसिस्टंट कमिश्नर, अंजनसिंगीकर देशपांडे, व त्यांतही रा. रा. अण्णासाहेब देशपांडे, दाजीसाहेब देशपांडे यांविषयीं त्यांना अत्यंत आदर असून या सर्व घराण्यांविषयीं त्यांच्या मनांत प्रेमळ व आपलेपणाची संपूर्ण भावना वसत होती.

एलिचपुरांत रा० रा० शास्त्री वकीलांचें घराणें व रा० रा० बाबासाहेब पांगरकरांचें घराणें व रा. रा. अण्णासाहेब देशपांडे यांचे विषयीं त्यांच्या मनांत प्रेम होतें. व्यवहाराच्या किंवा इतर कित्येक बाबतींत या तिन्ही घराण्यांतील कर्त्या माणसांबरोबर प्रसंगोपात ते विरोध करीत; पण त्यांच्याविषयींची आपुलकीची भावना त्यांच्या मनांत सतत जागृत होती व पुष्कळ प्रसंगीं ते या तिन्ही घराण्यांतील इसमांची सल्ला मसलत घेत.

गांवांतील धनिक, थोर, सावकार व व्यापारी यांपैकीं पुष्कळांचे बरोबर बाबासाहेबांचा व्यवहार होता. इतकेंच नाहीं पण गांवांत निष्कारण विरोधाच्या कंड्या उठविणाऱ्या लोकांना नामोहरम करण्यासाठीं

ज्यांच्याबरोबर बाबासाहेबांचा ३६ चा आंकडा असें लोक म्हणत त्यांच्याशीं देखील बाबासाहेब व्यवहार करीत व सर्वांशीं सलोखा ठेवल्यानेंच कार्य सुकर होतें अशी त्यांची समजूत असल्याने ते नेहमीं मिटतें घेण्याचा यत्न करीत.

## १३

## अंतकाळ

धनधान्य विपुल संपत्ति, संततीचें सुख, मातृदेवतेच्या सान्निध्याचा सर्वोत्तम आनंद, सद्गुरु श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती टेंबे महाराज व श्री पांडुरंगाचा संपूर्ण कृपाप्रसाद अशा सुमंगल परिस्थितींत बाबासाहेबांचा सुखमय जीवनक्रम चालला होता. संसारांतील उपाधींचा बोजा हळूहळू आपल्या शिरावरून त्यांनीं आपल्या पुत्राचे शिरावर टाकण्याला सुरवात केली होती. याच सुमाराला त्यांच्या पूज्य मातोश्रीला आजाराने पछाडलें. निस्सीम मातृभक्ताला मातेला होणारें दुःख असह्य झालें. त्यांनी प्रयत्नाची पराकाष्टा केली. त्यांच्या दिवसरात्रींच्या प्रयत्नाला यश मिळालें. हळुहळू बाईंची प्रकृति वृद्धावस्थेच्या प्रमाणांत सुधारली. बाबासाहेबांना समाधान झालें. मातृदर्शनाचा नित्य लाभ होणार याचा त्यांना परमानंद झाला. सर्वत्र आनंद व शांतता होती. वादळापूर्वी समुद्रांत देखील लाटा नसतात. घराण्यावर येऊं घातलेल्या आपत्तीची ही पूर्व सूचना तर नव्हती ना ? कुणाला ठाऊक ! मिलच्या व इतर कारभारांतून

जरी बाबासाहेबांनीं आपलें अंग अजिबात काढून घेतलें होतें तरी पण आपल्या अनुभवाचा फायदा संस्थेला मिळावा म्हणून ते मिल-मध्यें जात असत. याच सुमाराला त्यांचे जेष्ठ चि० रा० रा० रावसाहेब यांची प्रकृति थोडी जास्त बिघडली. ते कांही दिवस नाशीक येथे राहिले. कामामुळें बाहेरगांवीं जास्त दिवस राहणें शक्य नसल्यानें ते पुन्हा एलिचपूरला आले. पण बाबासाहेबांनी वाटेल तितकें नुकसान झालें तरी चालेल; पण रावसाहेबांची प्रकृति सुधारावी म्हणून रावसाहेबांच्या इच्छेविरुद्ध त्यांना पुनः नाशकास परत पाठविलें.

नाशकाला रावसाहेब गेले त्यावेळीं इलिचपूरला म्युनिसिपालि-टीच्या इलेक्शनचीं धामधूम सुरू होती. रावसाहेबांची इच्छा म्युनिसि-पालिटींत मिलची बाजू बरोबर मांडली जावी व मिल जी इतका कर देते त्या प्रमाणांत नाही तरी मिलच्या कामगारांच्या सोयीसाठीं रस्ता वगैरे बाबतींत म्युनिसिपॉलिटीने लक्ष द्यावे अशी असल्याने मिलमधून कोणाला तरी उभें करावें असें होतें. या बाबतींत बरीच चर्चा होऊन शेवटीं मिलतर्फे लेखकाला मेंबर म्हणून उभें राहण्याचा मान मिळाला. इलेक्शनच्यावेळीं व जिथे खूप चढाओढ त्याठिकाणीं निवडणुकींत यशस्वी होण्याला किती परिश्रम करावे लागतात याची जाणीव जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे.

बाबासाहेब ता. १७-४-३१ ला कांही कामानिमित्त उमरावतीला गेले होते. ते रात्रीं परत आले. तेव्हां त्यांच्या छातींत दुखायला लागलें तसेंच ते बिछान्यावर पडून होते. ता. १८-४-३१ ला सकाळीं इलेक्शनला

सुरवात होती. मीलचा इसम म्हणून त्यांनी उभा केल्यावर जर मिलचा इसम अयशस्वी झाला तर त्यांत मिलला कमीपणा आहे असें जाणून प्रकृति बरी नसतांना देखील ते सकाळीं ५॥ वाजतां मिलमध्यें आले व मिलच्या कामाच्या सोयीप्रमाणें मिलचे मतदारांना निवडणुकीचे जागीं मतें देण्यासाठीं पाठविण्याची त्यांनी तजवीज केली. या दगदगीमुळे त्यांना बराच त्रास झाला. पण आपल्या चिरंजीवाला आपण त्याच्या इच्छेविरुद्ध यावेळीं नाशकाला पाठवलें व मिलचा इसम जर निवडला गेला नाहीं तर पुन्हा तीन वर्षेपावेतों मिलची बाजू म्युनिसिपालिटींत मांडण्याची संधी जाईल याच एका सद्हेतूने त्यांनी निवडणुकींत भाग घेतला. मिलचा एक इसम अथवा त्यांचे म्हणविणारे दोन तीन इसम निवडून आल्याने आपल्या मनासारख्या गोष्टी होणार नाहीत हें त्यांना माहीत होतें. त्यांचा एवढाच उद्देश होता कीं, मिलची बाजू मिलने पत्रव्यवहार करून मांडण्यापेक्षा म्युनिसिपालिटीच्या एका सभासदाने मांडणें जास्त श्रेयस्कर.

प्रकृति नादुरुस्त होती तरी स्वतः मत देण्याकरतां ते दुपारीं आले व प्रकृति बरी नाही म्हणून घरीं गेले. एलिचपूरचे डॉक्टर व वैद्य यांच्या उपचाराला सुरवात झाली. ता. १९-४-३१ला त्यांना अत्यंत त्रास होऊं लागला. दुपारी इलेक्शनचा निकाल कळला. त्यांना बरें वाटलें. निवडणुकींत यशस्वी झाल्याबद्दल त्यांनी लेखकाला पार्टी मागितली. आपण बरें व्हा. आपल्या मनाप्रमाणे पार्टी मिळेल अशी त्यांना दिलेली कबूली पूर्ण करण्याचा प्रसंगच आला नाही. ता.२०-४-३१ ला मिलमध्यें मिलच्या डायरेक्टरांची सभा होती. त्या सभेला त्यांनी आपला आशीर्वाद पाठ-

विला. जवळ बसेलल्यांना त्यांना होत असलेल्या दुःखाकडे पाहवेना. त्यांना असह्य वेदना होत होत्या. रावसाहेबांना तार करूं का असें नानासाहेब व भाऊसाहेब यांनी विचारतांच त्यांनी उत्तर दिलें कांहीं नको माझी प्रकृति इतकी कांहीं बिघडली नाहीं. शिवाय रावसाहेबांची स्वतःची प्रकृति कांहीं बरी नाहीं. त्यांच्या प्रकृतिकडे पाहतां त्यांना तार न करणेंच बरें." जवळ असलेल्या मंडळींना या दुखण्यांतून बाबासाहेब उठतील असेंच वाटे. कारण छातींत दुखे त्याचवेळीं त्यांना अत्यंत कष्ट होत व ती वेळ निघून गेली कीं मग ते इतरांबरोबर बोलत. जणूं त्यांना कांहींच आजार नव्हता. डॉ० रावसाहेब देशपांडे व रा. आण्णासाहेब देशपांडे व रा. भाऊसाहेब शास्त्री वकील यांनी व बाबासाहेबांच्या मुलांनी प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठीं बाबासाहेबांना माथेरानला घेऊन जावें असें ठरविलें. त्याप्रमाणें माथेरानला बंगला भाड्याने ठरविण्याच्या बाबतींत तार करण्यांत आला व बंगला वगैरे व्यवस्था झाली. बाबासाहेबांच्या रोगाचें बरोबर निदान व्हावें म्हणून त्यांना ताबडतोब उमरावतीला नेण्यांत आलें. बरोबर नानासाहेब, राजाभाऊ व दादासाहेब हे गेले. तेथे इलिचपूरला नांवलौकीक मिळविलेले डॉ. मुदलियार, डॉ. जोशी यांना प्रकृति दाखविण्यांत आली. डॉ. म्हैसाळकर व डॉ. भोजराज हे बाबासाहेबां-जवळ नेहमीं हजर असत. डॉक्टरांच्या मतानें रोगाचें निदान ठरलें. उपचाराला ताबडतोब सुरवात झाली. उमरावतीला बाबासाहेबांच्या आजाराची हकीकत कळतांच त्यांच्या भेटीला तेथील मंडळी येऊं लागली. ता० २१-४-३१ ला प्रकृति साधारण बरी राहिली व आजारांतून बाबासाहेब उठतील असें वाटलें.

प्रकृति बरी असल्यानें ता. २२–४–३१ ला त्यांनी स्नान केलें व देवपूजाहि केली. मित्रमंडळी, व्यापारी व नातेवाईक यांच्याशीं जवळ जवळ सारा दिवस ते बोलत होते. त्यांनीं विश्रांति अशी घेतलीच नाही. सायंकाळीं सात वाजतां रा० वामणगांवकर, शेट मोतीसिंगई, मे० महमुदअल्ली यांच्याशीं ते बरेच वेळ बोलत होते.

मंडळी गेल्यानंतर कांहीं वेळाने त्यांच्या छातींत पुनः कळ आली. तसेच ते शौचाला स्वतः उठून गेले. शौच्याहून आल्यानंतर त्यांना कसेसेंच वाटूं लागलें. त्यांना ( Anjayana peptis ) अंजायन पेपटीसचा प्रखर (attack हल्ला आला आहे असें डॉक्टरांचें म्हणणें होतें. १९२२ मध्येही याचप्रमाणें त्यांना Anjayana peptis चा आजार झाला होता. पण त्यांतून ते त्यावेळीं निभावले. रात्रीं आठच्या सुमाराला त्यांना जास्त तळमळ वाटूं लागली. त्यांना असह्य वेदना होऊं लागल्या. क्षणोक्षणीं त्यांना आपल्या आईची आठवण होई. श्री. आण्णासाहेब, नानासाहेब यांना तसेच इतरांना त्यांनी सांगितलें की, आता इथे राहण्यांत अर्थ नाही इलिचपूरला बाईकडे घेऊन चला. “ बाबासाहेबांना कसेसेंच वाटते, सर्व मंडळींना व बाईला येथे घेऊन या ” असा तार करण्यांत आलेलाच होता. शेवटीं इलिचपूरला जावयाचें ठरलें. याच सुमाराला आईसहीत सर्वजण येत आहेत असा इलिचपुराहून तारहि आला. इतक्यांत बोलतां बोलतां त्यांना भयंकर वेदना होऊं लागल्या व अल्पावधींतच त्याच वेदनांत त्यांचा अंत झाला. शेवटच्या घटकेपावेतों ते सावध होते. ज्या मातेला ते क्षणभरसुद्धा विसरत नव्हते त्या मातेचें दर्शन अंतःकाळीं त्यांना घडूं नये ना ? मातेची आठवण करीत करीत त्यांनी प्राण सोडला.

सर्वांनी बाबासाहेब यांना इलिचपूरला नेण्याचें ठरविलें. रा० बाळाभाऊ, रा० आण्णासाहेब, रा० दत्तोपंत यांनी त्यांना इलिचपूरला आणले. इकडे घरची मंडळी उमरावतीला गेली. ते उमरावतीला आले त्यापूर्वीच बाबासाहेबांना मंडळी इलिचपूरला घेऊन गेली होती. घरांत कोणी नाही असें पाहून त्यांच्या जिवांत धस्स झालें. सर्वांनी बाबासाहेब आतांच एलिचपुरला गेले असें सांगितल्यावरून सर्वजण पुनः परतले.

बाबासाहेबांना एलिचपूरला आणण्यांत आलें. ते एलिचपूरला येताच त्यांच्या निधनाची वार्ता लागलीच गावांत पसरली. सकाळीं त्यांचे निधनानिमित्त विदर्भमिल व सिटी हायस्कूल बंद ठेवण्यांत आलें. त्यांच्या स्मशानयात्रेला बराच मोठा सर्व जातींचा समाज जमला होता.

त्यांचे वडील चिरंजीव श्री. रावसाहेब यांची व त्यांची गांठ पडली नाही. रावसाहेब नाशकाला आजारी असल्यामुळे त्यांना आपल्या वडिलांचे शेवटच्या दर्शनाचा लाभ मिळूं शकला नाही. त्यांच्या पुत्रांनी त्यांचा अंत्यविधि त्यांच्या लौकिकाला साजेसा असा केला. बाबासाहे-बांच्या मित्रांकडून, नातेवाईकांकडून व ज्यांच्या ज्यांच्याशीं बाबासाहेबांचा व्यापारामुळे, देणग्यामुळे व मिलमुळे संबंध आला होता त्या संस्थांकडून व सद्गृहस्थांकडून त्यांच्या चिरंजीवांना सांत्वनपर पत्रें, तारा व संदेश आले.

इलिचपुरांत मिलमध्ये व गांवांत दुखवट्याच्या जाहीर सभा झाल्या. गावांतील दुखवट्याच्या सभेचा विशिष्टपणा हा होता कीं या सभेचें अध्यक्षस्थान खान बहादूर खतीबसाहेब यांनी मंडित केलें होतें.

ही जाहीर सभा इलिचपुरांतील सर्व जातींच्या पुढाऱ्यांनी बोलावली होती. या सभेंत शास्त्री वकील, मे० नजरखा, पंडीत गोपीनाथजी, डॉ० श्रीरामपंत, मि. सुफी व रा. आण्णासाहेब देशपांडे व लेखक वगैरे बऱ्याच वक्त्यांचीं भाषणें झालीं. त्या सर्वांत मि. सुफी यांच्या भाषणांत वैशिष्ठ होतें. त्यांनी सांगितलें कीं, इलिचपुरच्या कामकाजांत हिंदु व मुसलमान अशा पार्टीज् आहेत; पण बाबासाहेब यांच्या दुखवट्याच्या सभेंत इलिचपुरांत हिंदू व मुसलमान एक आहेत यावरून बाबासाहेब हिंदूंना तसेच मुसलमानांना अतिशय प्रिय होते. अध्यक्षांनी आपल्या भाषणांत असें सांगितलें कीं हिंदू व मुसलमान यांच्या तंट्याचा ज्यावेळीं प्रसंग येई त्यावेळीं तो होऊं न देण्याची बाबासाहेब काळजी घेत असत, व त्यांच्याचमुळे आतापावेतों इलिचपुरांत हिंदू-मुसलमानांत तंटा झाला नाही. १९३२ मध्ये त्यांचे वर्षश्राद्धानिमित्त मिलमध्ये त्यांचा फोटो ठेवण्यांत आला, व तेथे व्यंकटेश जिमखाना सुरु करण्यांत आला. फोटोचा अनावरण समारंभ मि० स्टेंट डेप्युटीकमिश्नर अमरावती यांचे हस्तें झाला.

हा वार्षिक समारंभ दरवर्षी आतापावेतों त्यांनी स्थापन केलेल्या सर्व संस्थांतून सतत तेरा वर्षे होत आहे.

यावर्षी ता० २३-४-१९४४ इसवी रोजीं कै० बाबासाहेब विदर्भ मिलचे आद्य संस्थापक म्हणून त्यांचा संगमरवरी बस्ट मिल कंपाउंडांत ऑफीसच्या समोर मिलचे सर्व डायरेक्टरांनी ठराव केल्यावरून बसविण्यांत येत आहे.

# उपसंहार

बाबासाहेबांच्या निधनानंतर त्यांची कन्या सौ० गोदूबाई या निधन पावल्या. त्यांच्या निधनानें रा० रा० व्यंकटेश यशवंत उर्फ बाळाभाऊ अंजनसिंगीकर देशपांडे यांच्यावर अत्यंत दुःखद प्रसंग ओढवला. सौ० गोदूबाईच्या निधनानें दुःखद प्रसंगाची पूर्तता झाली नाहीं. आपल्या नातीच्या निधनाची दुःखद वार्ता बाबासाहेबांच्या मातोश्रीला कळतांच त्या फार हळहळल्या. लागलीच कांहीं दिवसांनी रा० रा० आबासाहेबांच्या पत्नी सौ० इंदिराबाई यांच्या निधनाची वार्ताहि मातोश्रीला ऐकावी लागली. पुढें बाबासाहेबांच्या मातोश्रींची प्रकृति बरी अशी राहीना व शेवटीं ता० ३ डिसेंबर १९३३ इ० रोजीं त्यांनी इहलोकीची यात्रा संपविली. बाबासाहेबांच्या तृतीय पत्नी व श्री० रावसाहेब यांच्या मातुश्री श्री० सरस्वतीबाई यांची प्रकृति पतीच्या निधनापासून जी खालावली ती सुधरली नाही. शेवटीं १९३८ च्या जुलै महिन्यांत त्या देवा घरीं गेल्या. परमेश्वर मायबाईच्या व सरस्वतीबाईच्या आत्म्याला शांती देवो.

बाबासाहेबांच्या निधनानंतर सर्व बंधु गुण्या-गोविंदानें रहात असून बाबासाहेबांची आठवण परिचितांना होणार नाही अशा तऱ्हेने वागत आहेत.

कै० वा० बाबासाहेब यांच्या आत्म्याला शांती मिळो व बाबासाहेब यांचे कारकीर्दीत देशमुखाचे घराण्याचा जो बोज व लौकिक होता तसा तो कायम राहून या घराण्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो अशी श्री रुक्मिणी पांडुरंगाचे चरणीं नम्र प्रार्थना आहे.

# परिशिष्ट १

**Extract From—**

# Amraoti District Gazetteer, Page 156.

( 137 ) The Ellichpur Deshmukhs are Brahmans and claim to have obtained their Watan before the establishment of the Moghul Rule in Berar having come from Bidar in the time of the Bahamani King. Probably because their Pargana was the head-quarters of the Province they never appear to have attained to such powers as the Daryapur family, though at least as wealthy. One village ( Wadhona ) is held by them in Jagir free of payment, and as they also possess a large amount of Khalsa land scattered in 27 different villages, and a 'Lawajma' which amounts in all to Rs. 4291-11-6, the family may be said to be in a flourishing condition in spite of a debt of Rs. 15000/- one - half of the estate. The property is divided, one share being in the hands of Vyankatrao Hanmantrao and the other of Harihar and Vithal sons of Madhorao.


श्री

## परिशिष्ट २


# श्री. बाबासाहेबांची जन्मपत्रिका

|| स्वस्तीश्री मन्नृपती विक्रमादित्य राज्यात् संवत् १९२५ तथा
||प्रतिष्ठानोद्भव गोदातीर विराजमान श्रीमन्नृपती शालीवाहन शके १७९०
|| विभवनाम संवत्सरे, उदगमने ग्रीष्मर्तौ, मासोत्तमे जेष्टमासे कृष्णपक्षे
||त्र्ययोदश्यां १३ तिथौ गुरुवारे घ ४४ पलानि ५१ कृत्तिका नक्षत्र
|| सन १२७८ तारीख १८ माहे जून सन १८६८ इसवी.
|| गोब्राम्हण प्रतिपालनैक दक्ष महाराज हणवंतराव आप्पासाहेब
|| देशमुख तेषां पत्नी सौभाग्यवती गुणविराजिता राधाबाई संज्ञां
|| स्वकुक्षे प्रथम पुत्ररत्नम् प्रासूत. तस्य अवकहडाचक्रा
|| त्रियायेण जन्मनक्षत्रकं नाम उमाकांत इति प्रतिष्ठितम् कृत्तिका
|| नक्षत्र श्रुक्रोदेवता राशेः राक्षसोगणः मेषयोनीः वानरवैरं
|| वैश्यवर्णः स्थलचर राशीः अंत्या नाडी क्षुराकारं षट्तारा: अस्य
|| मित्रे बुधौ शत्रु ग्रहौ रविंदौ गुरु भौमौ समौ अस्य जन्मनि
|| सुर्यभं पादयोः पतितं इति वाचनात् श्रेष्ट फलं अस्य मासनाम
|| उपेंद्र इति देवतानाम् विठ्ठलभक्त इति. नक्षत्रनाम उमाकांतशर्मा
|| व्यवहारिक नाम व्यंकटराव बाबासाहेब इति प्रतिष्ठितं

**श्रीमतां जन्म लग्न कुंडलीयं.**




**जन्म राशिस्थ चंद्र कुंडली**



परिशिष्ट ३

# बाबासाहेबांचे जवळचे नातेवाईक

बाबासाहेबांच्या मामांचीं मुलें :—

श्री. रा रा. राजेश्वर पांडुरंग देशपांडे—अमडापूर ( मयत )

,, अनंत रामचंद्र देशपांडे—म्यानेजर, श्री पांडुरंग जिनिंग फॅ०

,, कृष्णराव रामचंद्र देशपांडे, बी. ए.—सेक्रेटरी डिस्ट्रिक्ट कौंसिल, आकोला.

,, नारायण रामचंद्र देशपांडे, बी. ए.—प्रायव्हेट मेडिकल प्रॅक्टिशनर, एलिचपूर

,, शामराव गोपाळ देशपांडे —अमडापूर

बाबासाहेबांच्या आतेचीं मुलें:—

श्री. रा. रा. नारायण गोविंद देशपांडे—अंजनसिंगी सुखवस्त जमेदार.

,, निळकंठ गोविंद देशपांडे रिटायर्ड इ. ए. सी. ( मयत )

,, केशव गोविंद देशपांडे

,, यशवंत गोविंद देशपांडे, B. A. LL. B. अॅडव्होकेट, अमरावती.

,, गोपाळ गोविंद देशपांडे, सुखवस्तु जमेदार ( मयत )

बाबासाहेबांच्या मावशीचीं मुलें:—

श्री. रा. रा. भगवंतराव नागोराव उर्फ भाऊसाहेब देशपांडे, रिसोड

,, श्रीनिवास नागोराव उर्फ दादासाहेब पारडीकर कॉटन ब्रोकर, परतवाडा

बाबासाहेबांच्या पत्नीकडील नातेवाईक:—

श्री. रा. रा. शामराव अंबादास देशपांडे आष्टी, B. A.

,, माधव अंबादास देशपांडे आष्टी, वर्धा.

,, नरहर भगवंत उर्फ अण्णासाहेब देशपांडे, सुखवस्तु, जमेदार चेंडकापूर.

श्री. रा. रायसाहेब पुरुषोत्तम भगवंत उर्फ रावसाहेब देशपांडे
मेहुणे ( मयत )

,, शामराव गोविंद चौधरी– पाथरी परभणी,(मयत) मेहुणे

,, कृष्णराव गोविंद चौधरी मेहुणे

,, खंडेराव. त्रिंबक चौधरी ,,

बाबासाहेबांच्या कन्या व जावई:—

सौ. नीराबाई (मयत) श्री. रा. नारायणराव डोळे जावई –
सावकार, अमरावती

,, इंदिराबाई— श्री. रा. त्रिंबक गोविंद देशपांडे जावई
सुखवस्तु, यावल.

,, गोदुबाई (मयत) श्री. रा. व्यंकटेश यशवंत देशपांडे
अंजनसिंगीकर, जावई (आण्णासाहेब देशपांडे
यांचे चिरंजीव ) अमरावती.

,, गंगूबाई– श्री. रा. कृष्णराव मार्तंड वाईकर, जावई
मालगुजार ( कारंजा, सी. पी. )

,, गयाबाई — ,, पंढरीनाथ रामचंद्र फडनीस, जावई
एदलाबाद.

,, जिजीबाई— ,, मल्हारराव रामराव उर्फ भय्यासाहेब
मैराळ, जावई (नवकोट नारायण
1st. Class सरदार ) बडोदे.

बाबासाहेबांच्या सुनांचे आप्तवर्गः—

सौ. रुक्मिणीबाई पांडुरंग— श्री. कै. कृष्णराव गोपाळराव उर्फ भाऊसाहेब देशपांडे, आकोटकर B. A. LL. B. Advocate अमरावती (वडील)

सौ. लक्ष्मीबाई नारायणराव—श्री. रा. एन्. जी. सुभेदार, ( मयत ) B. A. B. L., Retd. District and Sessions Judge नागपूर ( वडील )

„ सुशिलाबाई नारायणराव— श्री. कै. कृष्णराव सखाराम देशपांडे, बाळापूर ( वडील )

सौ. द्वारकाबाई मेघश्याम— श्री. विश्वनाथ त्रिंबक सोनटके, (मयत) सुखवस्तु बोदवड (भाऊ)

सौ० इंदिराबाई मेघशाम— श्री. रायसाहेब पुरुषोत्तम ( मयत ) भगवंत उर्फ रावसाहेब देशपांडे, एलिचपूर ( वडील )

„ पद्मावतीबाई मेघश्याम—श्री. रा. बाबासाहेब ठोमरे, आकोट ( वडील )

„ ताराबाई राजेश्वर—श्री. नानासाहेब लिंबेकर, जहागिरदार ( वडील ) पाथरी, परभणी.

„ उषाबाई भगवंतराव— श्री. नानासाहेब मोडक, चीफ्-इन्जीनियर मुंबई कारपोरेशन (वडील)

„ वीणाबाई गोविंदराव— खरे, B. A. LL. B. वकील, भुसावळ ( वडील )

धोंडो मुकुंद देशपांडे, बाळापूरकर
( सेक्रेटरी विदर्भ मिल्स एलिचपूर ) यांची

# ★ साहित्य सेवा ★

## प्रकाशित

१. अहिंसा
२. ब्रह्मचर्य दिग्दर्शन
३. अवधाना ( गुजराथींत )

## कादंबऱ्या

४. पृथ्वीवल्लभ
५. पावागडचा प्रलय
अथवा भद्रकाली
६. आत्मबलिदान
७. अनारकली आणि सलीम
अथवा अपराधी अकबर
८. स्वातंत्र्याच्या रणांगणांत
९. प्रेम तें हेंच
१०. बंडाचें निशाण
११. साधू कीं सैतान अथवा
संदिग्ध संसार भाग १ ला
छोटीं व मोठीं प्रोज व

## संगित नाटकें

१२. शिवाजीचा मावळा
१३. शिवकालीन तरुण
१४. श्रीमंत
१५ ऋणविमोचन
१६ सुमन विजय
१७ वीरांचा मार्ग

## अप्रकाशित

१८ बुद्धिजीवियांचा बगीचा

## कादंबरी

१९ साधू कीं सैतान भाग २ रा
२० राधाकिसन

छोटी मोठी प्रोज व संगीत

## नाटकें—

२१ वसंत माधव
२२ स्वराज्य सूत्र
२३ आहुती ( चित्रा )
२४ संभावितांच्या लीला
२५ मीनाक्षी
२६ लक्ष्मीबाई पथक
२७ सरस्वतीची सेवा
२८ प्रजेच्या प्राणासाठीं
२९ आईसाठीं
३० सीतामाई

म. ग्र. सं. ठाणे
विषय
सं. नं.

व हणमंतराव

उर्फ

# बाबासाहेब देशमुख

आद्यसंस्थापक,

दि विदर्भ मिल्स बेरार लि०

इलिचपूर

REFBK-0006498

लेखकः—

धोंडो मुकुंद देशपांडे